## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1591 नाग/2010

श्री मोहन वासुदेव केळकर
प्लॉट नं. 90, उषःकाल बिल्डिंग, गांधीनगर,
नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. ए. गायकवाड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त(प्रशासन)
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई 18
2) श्री चव्हाण
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(प्रशासन)
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई 18 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(प्रशासन) आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन एकुण 1 ते 7 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. त्यांना अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील निकाली काढल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अर्ज सादर करुन एकुण 1 ते 7 मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्या मुद्यांपैकी त्यांना दि. 2.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी मुद्या क्र.5 आणि मुद्या

क्र.6 याबाबतची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगा समोर सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 27.4.2010 रोजीचा अर्ज त्यांचेकडे दि. 3.5.2010 रोजी प्राप्त झला. त्या अर्जातील माहिती काढण्यात आली आणि माहितीची फी रु. 70/- भरण्याकरीता अपीलकर्त्यास दि. 19.5.2010 च्या पत्राने कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि. 27.7.2010 रोजी माहितीची फी रु. 70/- भरणा केली आणि अपीलकर्त्यास दि. 2.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी माहिती अर्जातील मुद्दा क्र.5 आणि मुद्दा क्र.6 ची माहिती अपीलकर्त्यास मिळाली नाही असे अपीलकर्त्याने सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर अपीलकर्त्यास मुद्दा क्र.5 आणि मुद्दा क्र.6 ची माहिती देखील उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

6. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच माहिती अर्जातील मुद्या क्र.5 आणि मुद्या क्र.6 ची माहिती देखील आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती अर्जातील एकुण 1 ते 7 मुद्यांची माहिती प्राप्त झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1312-1313

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1588 नाग/2010

श्री मोहन वासुदेव केळकर
प्लॉट नं. 90, उषःकाल बिल्डिंग, गांधीनगर,
नागपूर ता. जि. नागपूर 10 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री म. ना. कांबळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(पदुम–6)
कृष व पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय मुंबई 32
2) श्री सु. ज. सोवितकर
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(पदुम–6)
कृष व पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(पदुम–6) कृषी व पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन विभागीय चौकशी प्रकरण क्रमांक 657 ते 664/92 श्री आर. आर. खराबे व इतर 7 शासकीय दुध योजना नागपूर चे कर्मचारी संदर्भात एकुण 1 ते 8 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.8.2010 च्या पत्राने सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (ज) नुसार देता येत नाही असे कळवून माहिती देण्यास नकार दिलेला दिसून येतो. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.8. 2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती देण्यास नकार दिलेला असून सदरची कार्यवाही

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य ठरविली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.26.7.2010 रोजी अर्ज सादर करुन वर नमूद केल्या प्रमाणे विभागीय चौकशी प्रकरणाची एकुण 1 ते 8 मुद्यांची माहिती मागितलेली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिलेला आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकर्ता यांनी सुनावणीत आणखी असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (ज) नुसार माहिती देण्यास दिलेला नकार हा चुकीचा आहे त्यांनी मागितलेल्या विभागीय चौकशी संदर्भातील कार्यवाहीचे कागदपत्रे सन 1992 च्या कालावधीतील आहे म्हणजे सुमारे 18 वर्षा पूर्वीचे विभागीय चौकशीची त्यांनी कागदपत्रे मागितलेली आहे. विभागीय चौकशीच्या प्रकरणात माहिती अधिकारा खाली कोणतीही माहिती गोपनिय नाही म्हणून त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि.26.7.2010 चा अर्ज त्यांचेकडे दि.27.7.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जास दि. 21.8.2010 च्या पत्राद्वारे सदरची माहिती गोपनिय स्वरुपाची असल्या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (ज) नुसार माहिती देता येत नाही असे कळविण्यात आले. कारण सदरची माहिती ही विभागीय चौकशी संदर्भात असल्यामुळे गोपनिय स्वरुपाची आहे त्यामुळे ती माहिती देण्यात आलेली नाही. तसेच यापूर्वी आयोगाकडे विभागीय चौकशी प्रकरणात अपील क्र. 275/2007 दाखल झालेले होते त्यामध्ये आयोगाने दि. 3.8.2007 रोजी निर्णय दिलेला असून त्या निर्णयात असे नमुद केले आहे की अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही विभागीय चौकशीच्या संदर्भात असल्यामुळे व विभागीय चौकशीचा निर्णय झालेला नसल्यामुळे सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) प्रमाणे देता येत नाही म्हणून अपील खारीज करुन निकाली काढले आहे. म्हणून या निर्णयाप्रमाणे सदरचे अपील देखील खारीज करावे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर नमुद केले. तथापी सदर प्रकरणी विभागीय चौकशी पूर्ण करुन त्यावर शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे त्याचेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेवून अपीलकर्त्यास माहिती अर्जातील सर्व मुद्यांची माहिती देणे योग्य होणार नाही मात्र अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती मधील मुद्या क्र. 1 विभागीय चौकशी सुरु करणे बाबत दिलेल्या आदेशाची प्रत तसेच मुद्या क्र. 2 मधील त्यांचेवर बजावण्यात

आलेले आरोपपत्र तसेच आरोपपत्राला अपीलकर्त्याने दिलेले उत्तर आणि त्यांचे उत्तर समाधानकारक न वाटल्याने शासनाने विभागीय चौकशी प्रस्तावित केली त्या आदेशाची प्रत इत्यादी माहिती दिल्यास या माहितीचा विभागीय चौकशी वर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि.26.7.2010 च्या अर्जातील माहिती त्यांचेशी संबंधीत असलेली मुद्या क्र. 1, 2, 3, 4 आणि 6 ची माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**<br>
Ageyord6.1312-1314

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1590 नाग/2010

श्री मोहन वासुदेव केळकर
प्लॉट नं. 90, उषःकाल बिल्डिंग, गांधीनगर,
नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. ए. गायकवाड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त(प्रशासन)
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई 18

2) श्री चव्हाण
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(प्रशासन)
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई 18 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.2.2011 )**

### नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.1.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(प्रशासन) आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास विभाग, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्या सोबत जोडलेल्या 'ध' विवरणपत्रात 'अ' मध्ये 1 ते 4 मुद्ये आणि 'ब' मध्ये 1 ते 3 मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना काही मुद्यांची माहिती मिळाली आणि काही मुद्यांची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील निकाली काढल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की त्यांना त्यांच्या माहिती अर्जातील 'अ' भागामधील मुद्या क्र. 1, 2 आणि 3 ची माहिती मिळाली मात्र मुद्या क्र. 4 ची माहिती मिळाली नाही तसेच 'ब' भागामधील मुद्या क्र. 1 ची माहिती मिळाली आणि मुद्या क्र. 2 आणि 3 ची माहिती मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 28.8.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 17.9.2010 ला प्राप्त झाला. माहिती अर्जातील माहिती काढण्यात आली आणि माहितीची फी रु. 94/– भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 20.9.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि. 11.10.2010 रोजी माहितीची फी रु. 94/– भरणा केली. आणि त्यानंतर दि. 12.10.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास माहिती अर्जातील भाग 'अ' मधील मुद्या क्र. 4 ची माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती अर्जातील 3 मधील मुद्या क्र. 4 ची कोणतीही माहिती त्यांचेकडे नाही. तथापी माहिती उपलब्ध नसल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल तसेच माहिती अर्जातील 'ब' मधील मुद्या क्र. 2 बाबत फाईल मधील टिपण्या व नोंदीच्या सत्यप्रती अपीलकर्त्यास पुरविणे योग्य होईल आणि मुद्या क्र. 3 बाबत दक्षता विभागाकडून प्रशासन विभागास कोणताही अहवाल प्राप्त झाला नाही असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे देखील संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या कडील दि. 28.8.2010 माहितीच्या अर्जातील 'अ' भागातील मुद्या क्र. 4 बाबत माहितीची वस्तुस्थिती कळवावी तसेच 'ब' भागातील मुद्या क्र. 2 बाबत फाईल मधील टिपण्या व नोंदीच्या सत्यप्रती उपलब्ध करुन द्यावी आणि मुद्या क्र. 3 बाबत दक्षता विभागाकडून अहवाल प्राप्त झाला नाही म्हणून कार्यवाही झालेली नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1319-1321

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1596 नाग/2010

श्री राजेंद्र तानबाजी सतई
साई प्रसाद, 69, महालक्ष्मी नगर,
गल्ली नं.3 मानेवाडा रोड नागपूर
ता. जि. नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री लिलाधर ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खरसोली
पो. सालईगोधनी
ता. जि. नागपूर 441204 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खरसोली पंचायत समिती नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री लिलाधर रामचंद्रजी ठाकरे शिक्षक यांचे 1 जानेवारी 2005 ते 31 डिसेंबर 2009पर्यंतचे शाळा उपस्थिती (मस्टर) व हलचल रजिस्टरच्या सांक्षांकित प्रती मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खरसोली पंचायत समिती नागपूर यांचेकडे दि. 23.7.2010 रोजी माहिती मागण्याचा अर्ज करुन वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी दि. 21.8.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना असे कळविले की सदरची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असून एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाची संबंधित माहिती असल्यामुळे सदरची माहिती माहितीच्या अधिकारा खाली पुरविता येत नाही तसेच हलचल रजिस्टर हे मुख्याध्यापकाचे शालेय दप्तरात उपलब्ध नाही म्हणून त्याची माहिती देता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.8.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खरसोली श्री लिलाधर ठाकरे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 23.7.2010 रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता त्यांना असे दिसून आले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची व त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे तसेच सदरची माहिती सेवा अभिलेखाची संबंधित आहे म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास देता येणार नाही असे दि. 21.8.2010 च्या पत्राने कळविले. तसेच शाळेत मुख्याध्यापकाचे कोणतेही हलचल रजिस्टर ठेवण्यात येत नाही त्यामुळे हलचल रजिस्टर उपलब्ध नाही असे देखील त्यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे सुनावणीत नमुद केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांच्या वतीने श्री डी. स. बावने अधिक्षक हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दि. 24.8.2010 रोजी प्राप्त झाले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 17.9.2010, दि. 24.9.2010, दि. 4.10.2010 रोजी ठेवण्यात आली होती. तथापी या सुनावणीस काही वेळेला अपीलकर्ता व काही वेळेला जन माहिती अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत. तसेच काही वेळेला प्रथम अपीलीय अधिकारी हे प्रशिक्षणासाठी व्यस्त असल्यामुळे या तारखांना सुनावणी झाली नाही मात्र दि. 13.10.2010 रोजी अंतीम सुनावणी घेण्यात आली. प्रस्तूतच्या सुनावणीस अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. त्यांचे म्हणणे एकून घेण्यात आले आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.10.2010 रोजी देण्यात आला. प्रथम

अपीलाच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की माहिती अधिकारी यांनी शिक्षकाचे व मुख्याध्यापकाचे हलचल रजिस्टर उपलब्ध नसल्यामुळे ते देता येणार नाही परंतू उपस्थिती (मस्टर) ची झेरॉक्स प्रत सांक्षांकित करुन प्रती पेज रु. 2/– फी घेवून शासकीय खजिन्यात अपीलकर्त्याने जमा करावी व फी भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपस्थिती (मस्टर) ची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद करण्यात आले.

6. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की प्रथम अपीलात दिलेल्या निर्णयाप्रमाणे माहितीची फी व टपाल खर्च भरण्या बाबतचे दि. 21.1.2010 चे पत्र पंजीबध्द डाकेने अपीलकर्त्यास त्यांच्या अधिकृत पत्त्यावर पाठविण्यात आले होते आणि त्या पत्रामध्ये झेरॉक्स प्रतीचा खर्च व टपाल खर्च असे मिळून रु. 365/– भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले होते. मात्र सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांचेकडे परत आले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्त्यास फी भरण्याबाबतचे पत्र दि. 27.11.2010 रोजी दुसरे पत्र पाठविण्यात आले. सदरच्या दोन्ही पत्रांपैकी दि. 27.11.2010 चे पत्र अपीलकर्त्यास मिळाले मात्र दि. 21.11.2010 चे पत्र त्यांना उपलब्ध झाले नाही असे अपीलकर्ता यांनी नमूद केले. त्यावर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगा समोर अपीलकर्त्यास दि. 21.11.2010 चे फी भरण्या बाबतचे पत्र पंजीबध्द डाकेने पाठविण्यात आल्या बाबतचे पाकीट आणि ते पाकीट त्यांचेकडे परत आल्या बाबतची माहिती आयोगा समोर दाखविली त्यावरुन असे दिसून आले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 21.11.2010 चे फी भरण्या बाबतचे पत्र रजिस्टर पोस्टाने पाठविले होते मात्र ते त्यांचेकडे परत आलेले आहे. तथापी फी भरण्याचे दि. 27. 11.2010 चे पत्र अपीलकर्त्यास मिळाल्याचे अपीलकर्त्यानी सुनावणीत मान्य केले. तथापी त्या पूर्वीच अपीलकर्त्यान दि. 25.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असल्यामुळे त्यांनी फी चा भरणा केला नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे माहितीची फी जन माहिती अधिकारी यांचेकडे भरणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्ता यांना सदरची माहिती व्यक्तीशः घ्यावयाची असल्यामुळे टपालाचा खर्च लावू नये असे त्यांनी आयोगापुढे नमूद केले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीच्या फी बाबत फक्त झेरॉक्स खर्चाची फी घेवून टपालाचा खर्च न घेता अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे उपस्थिती रजिस्टरची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

4

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात व्यक्तीशः उपस्थित राहून माहितीच्या झेरॉक्स प्रतीची फी भरणा करावी आणि फी चा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता हे माहिती व्यक्तीशः घेणार असल्याने त्यांना टपाल खर्च आकारण्यात येवू नये.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1319-1322

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1600 नाग/2010

श्री सुधाकर केशवराव बागडे
बस स्थानक मागे, हाऊसिंग बोर्ड कॉलनी, सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर 441107 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिलीप भगत
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री पी. जी. जागरे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सावनेर नगर पालिका हद्दीत नव्याने समावेश करण्यात आलेल्या ग्रामपंचायतची नावे, नगर परिषद हद्दीत जोडल्या जाणा—या मौजा व शेतीच्या खसरा नंबरची माहिती मिळण्याबाबत विनंती केली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.6.2010 च्या पत्राने अपीलकर्ता यांना असे कळविले की सावनेर नगर पालिका हद्दीत नव्याने समावेश करण्यात आलेल्या ग्रामपंचायत बाबत शासनाकडून कोणताही दस्तऐवज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही तसेच मौजा व शेतीच्या खसरा नंबरची माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही त्यामुळे मागणी केलेले दस्तऐवज त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे सदर माहिती पुरविणे शक्य नाही असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपील खारीज झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन वर नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.6.2010 च्या पत्राने सदरची माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे त्यांनी कळविले. म्हणून त्यांनी खंड विकास अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती सावनेर श्री पी. जी. जागरे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 14.6.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला. आणि त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 30.6.2010 च्या पत्राने मागितलेली माहिती पंचायत समिती सावनेर कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे पुरविता येत नाही असे त्यांना कळविले. कारण अपीलकर्त्याने सावनेर नगर पालिका हद्यीत नव्याने समावेश करण्यात आलेल्या ग्रामपंचायतची नावे, नगर परिषद हद्यीत जोडल्या जाणा–या मौजा व शेतीच्या खसरा नंबरची माहिती मिळण्याबाबत विनंती केली होती. तथापी सावनेर नगर पालिका हद्यीत नव्याने समावेश करण्यात आलेल्या ग्रामपंचायत बाबत शासनाकडून कोणताही दस्तऐवज हया कार्यालयास प्राप्त झालेला नाही तसेच मौजा व शेतीच्या खसरा नंबरची माहिती या कार्यालयाशी संबंधित नाही असे त्यांनी अपीलकर्त्यास दि. 30.6.2010 च्या पत्राने कळविलेले आहे.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती सावनेर श्री दिलीप भगत हे हजर होते. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता हे वारंवार माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन माहिती मागत असतात तसेच जी माहिती पंचायत समितीशी संबंधीत नाही अशी देखील माहिती ते मागत असतात आणि त्यामुळे पंचायत समितीच्या कर्मचा–याचा अधिका–याचा निष्कारण वेळ खर्च होत असतो. अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा हेतू देखील जन हिताशी संबंधीत नसतो. कार्यालयास केवळ त्रास द्यावा हया हेतूने ते नेहमी माहिती मागत असतात असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा समोर नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 30.6.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य दिसून येते. तसेच मौजा व शेतीच्या खसरा नंबरची माहिती ही पंचायत समिती कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे देता येत नाही असे कळविलेले देखील योग्य दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1323-1325

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1594 नाग/2010**

श्री सुधाकर केशवराव बागडे
बस स्थानक मागे, हाऊसिंग बोर्ड कॉलनी, सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर 441107 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एन. व्ही. बुटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री एफ. टी. पीसे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्राम पंचायत पिंपळा (डा.बं.)
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.5.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज जन माहिती अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडे सादर केला आणि त्यात ग्राम पंचायत पिंपळा (डाक बंगला) ता. सावनेर या ग्राम पंचायतच्या हद्यीत 1 जानेवारी 2007 ते 24.5.2010 पर्यंतच्या कालावधीत गावठाणात दर्शवून ग्राम पंचायत रेकॉर्डवर किती ग्रामस्थांची कर आकारण्यात आली त्यांच्या नावाची यादी माहितीच्या अधिकारा खाली मागितलेली होती. सदरचा अर्ज ग्राम पंचायत पिंपळा (डाक बंगला) यांचेशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी पंचायत समिती सावनेर यांनी तो अर्ज सचिव ग्राम पंचायत पिंपळा (डा.बं.) यांचेकडे पाठविला. मात्र सचिव ग्राम पंचायत पिंपळा यांनी विहित मुदतीत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्याांनी दि. 22.9.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.10.2010 रोजी दिला. त्यामध्ये सचिव ग्राम पंचायत पिंपळा यांनी दि. 31.10.2010पर्यंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. मात्र त्यांना दि. 31.10.2010पर्यंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तथापी सदरची माहिती दि. 2.11.2010 च्या पत्राने त्यांना पाठविली. सदरची माहिती सुमारे पाच महिने उशिराने पाठविली. तसेच माहिती मुदतीत उपलब्ध होण्यासाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर केला नाही असेही अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. आणि माहिती उशिरा प्राप्त झाल्यामुळे

झालेल्या विलंबाबद्यल संबंधीतावर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे शास्तीची कार्यवाही करावी असे आग्रही प्रतिपादन अपीलकर्ता यांनी सुनावणीत केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत पिंपळा (डा.बं.) ता. सावनेर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 24.5.2010 चा अर्ज त्यांचेकडे जन माहिती अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडून दि. 2.6. 2010 च्या पत्राने प्राप्त झाला. सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना पंचायत समितीच्या जन माहिती अधिकारी यांनी दिलेली असून त्यामध्ये अपीलकर्ता यांनी सचिव ग्राम पंचायत पिंपळा यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविलेले होते. मात्र अपीलकर्त्याने सचिव ग्राम पंचायत पिंपळा यांचेकडे संपर्क न केल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आली नाही असे सचिव ग्राम पंचायत पिंपळा यांनी सुनावणीत नमुद केले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 22.9.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि. 16.10.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे झाली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.10.2010 रोजी देण्यात आला. सदरच्या निर्णयात अपीलकर्त्यास दि. 31.10. 2010पर्यंत माहिती देण्याचे नमूद केले होते. त्यानुसार अपीलकर्त्यास दि. 2.11.2010 रोजी सचिव ग्राम पंचायत पिंपळा यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये असे नमुद केले की ग्राम पंचायत पिंपळा (डा.बं.) येथे 1 जानेवारी 2007 ते 24.5.2010 या कालावधीत जी कर आकारणी करण्यात आली त्यांची नोंद गावठाणात दर्शवून करण्यात आलेली नाही. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र सदरची माहिती विलंबाने सुमारे पाच महिने उशिराने प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमूद करुन विलंबाबद्यल संबंधीतावर शास्तीची कार्यवाही करण्याची मागणी केली.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी पंचायत समिती सावनेर यांनी अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 24.5.2010 चा अर्ज जन माहिती अधिकारी ग्राम पंचायत पिंपळा (डा.बं.) यांचेकडे दि. 2.6.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती देण्यासाठी हस्तांतर केलेला होता. सदरचा अर्ज सचिव ग्राम पंचायत पिंपळा (डा.बं.) यांचेकडे दि. 3.6.2010 रोजी प्राप्त झालेला दिसून येतो. म्हणून सचिव यांनी 30 दिवसाच्या मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथाची सचिवानी 30 दिवसात का माहिती दिली नाही याबाबत स्पष्टीकरण विचारले असता त्यांनी सुनावणीत असे नमुद केले आहे की अपीलकर्त्याने त्यांच्या कार्यालयाशी माहिती मिळण्यासाठी संपर्क केला नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 प्रमाणे 30 दिवसाचे आत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक आहे. म्हणून अपीलकर्त्याने माहिती घेण्यासाठी त्यांचेशी संपर्क साधला नाही म्हणून माहिती देता आली नाही हे दिलेले कारण योग्य व न्यायाचीत दिसून येत नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील दि. 31.10.2010 च्या आत माहिती देण्याचे निर्देश असतांनाही सचिव यांनी दि. 31.10.2010 च्या आत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर दि. 2.11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन असे दिसून येते की सचिव यांनी अपीलकर्त्यास सुमारे पाच महिने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. विलंबाबद्यल त्यांनी केलेला खुलासा संयुक्तीक व योग्य दिसून येत नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे ते शास्तीस पात्र ठरतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत पिंपळा (डा.बं.) ता. सावनेर जि. नागपूर यांनी अपीलकर्त्यास सुमारे पाच महिने उशीराने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत सुनावणीत केलेला खुलासा समाधानकारक व योग्य दिसून येत नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– ची शास्ती त्यांचेवर लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावी.

सदरच्या शास्तीची वसुली **खंड विकास अधिकारी पंचायत समिती सावनेर** यांनी करावयाची आहे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **खंड विकास अधिकारी पंचायत समिती सावनेर** यांचेकडे कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1327-1329

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1602 नाग/2010**

श्री डॉ. महेंद्रकुमार ऋषिजी धावडे
21, द्रोणागिरी, गेडाम ले–आऊट(भामटी), नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्रीमती सुजाता रेवतकर
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
हिंदुस्थान विद्यालय, लकडगंज, नागपूर
ता. जि. नागपूर 8 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीस आयोगासमोर असे सांगितले की माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हिंदुस्थान विद्यालय, लकडगंज, नागपूर यांचेकडे शाळेतील नेमणूका, मागासवर्ग कक्षाचे ना हरकत प्रमाणपत्र, तसेच शाळेत असलेल्या सुविधा इत्यादीच्या माहितीबद्यल एकुण 1 ते 8 मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 3.8.2010 च्या पत्राने मुद्या क्र. 4, 5, 6 ची माहिती मिळाली तसेच मुद्या क्र. 7 बद्यल सुची स्वरुपात माहिती मिळाली मात्र फोटो मिळालेले नाहीत तसेच मुद्या क्र. 8 बद्यल कर्मचा–याची सुची त्यांना देण्यात

आली. मात्र सदरच्या सुचीत त्यांना पाहिजे असलेली माहिती त्यात दिसून येत नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमूद केले. अपीलकर्त्याला अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपीलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध असल्यास ती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमूद केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल कल्याचे सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका हिंदुस्थान विद्यालय, नागपूर हया उपस्थित होत्या. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दि. 7.7.2010 चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला. त्या अर्जातील माहिती काढण्यात आली आणि माहितीची फी रु. 20/— भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 3.8.2010 च्या पत्राने कळविले. अपीलकर्त्याने दि. 6.8.2010 रोजी माहितीची फी भरणा केली आणि त्यानंतर दि. 10.8.2010 रोजी अपीलकर्त्यास शाळेकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आणखी असे नमुद केले की अपीलकर्त्याने एकुण 1 ते 8 मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यापैकी मुद्या क्र. 1, 2 आणि 3 बाबतची कोणतीही माहिती त्यांच्या शाळेकडे उपलब्ध नाही. म्हणून अपीलकर्त्यास 1 ते 3 मुद्यांची माहिती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे कळविलेले आहे. तसेच मुद्या क्र. 4, 5, 6 हया मुद्यांची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे मुद्या क्र. 7 बाबत अपीलकर्त्याने शाळेमधील चितेश्वर भवन व रामपेठ भवन येथील स्त्री शिक्षीका कक्ष, पुरुष शिक्षीका कक्ष, वर्ग खोल्या, कार्यालय, पोषण आहार कक्ष, स्वच्दता गृह, मुला व मुलींसाठी व पुरुष व महिलांसाठी संडास मुतारी, पिण्याच्या पाण्याचे स्थान, भूगोल कक्ष, संगीत कक्ष, चित्रकला कक्ष, ग्रंथालय इत्यादी बाबतचे फोटो मागितलेले आहेत. मात्र शाळेकडे उपलब्ध असलेल्या या सुविधांचे कोणतेही फोटो उपलब्ध नाहीत. म्हणून अपीलकर्त्यास त्याचे फोटो उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र अपीलकर्त्यास शाळेमध्ये उपलब्ध असलेले कक्ष तसेच वर्ग खोल्या आणि इतर सुविधांबाबतची संख्यात्मक स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मुद्या क्र. 8 बाबत अपीलकर्त्याने मागितलेली कर्मचा—याची सुची ज्या स्वरुपात शाळेकडे उपलब्ध आहे त्या स्वरुपात कर्मचा—याची सुची अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली आहे. मुद्या क्र. 7 व 8 ची वर नमूद केलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र फोटो स्वरुपात माहिती प्राप्त झाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीव जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की अपीलकर्ता हे शाळेमध्ये सहाय्यक शिक्षक पदावर कार्यरत आहे. तथापी शाळेला त्रास देण्याच्या हेतूने माहिती अधिकाराखाली नेहमी अर्ज करुन माहिती मागत असतात. त्यामुळे त्यांनी मागितलेली माहिती काढण्यासाठी बराच वेळ खर्च होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिवविण्यावर परीणाम होतो. जन माहिती अधिकारी हया स्वतः मुख्याध्यापिका आहेत. मात्र त्यांना वर्गामध्ये त्यांच्या संबंधीत विषया विषयी मुलांना शिकविणे आवश्यक असते. तथापी अपीलकर्ता हे त्यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन त्यांना सतत त्रास देत असतात तसेच अपीलकर्त्या विषयी विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांच्या बाबतीत तक्रारी केलेल्या आहेत त्यामुळे अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा हेतू हा कोणत्याही व्यापक जनहितासाठी नसून केवळ शाळेला त्रास व्हावा हा त्यांचा हेतू असतो. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे फेटाळून लावावे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्र. 1 ते 8 ची कोणतीही माहिती शाळेकडे उपलब्ध नाही म्हणून तसे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे कळविलेले दिसून येते. तसेच मुद्या क्र. 4, 5 आणि 6 ची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे मुद्या क्र. 7 बाबत शाळेकडे कोणत्याही प्रकारचे फोटो उपलब्ध नाहीत म्हणून फोटो ऐवजी शाळेकडे असलेल्या सुविधांची सुची अपीलकर्त्यास दिलेली दिसून येते. मात्र याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की नियमाप्रमाणे शाळेने स्त्री शिक्षीका कक्ष, पुरुष शिक्षीका कक्ष, वर्ग खोल्या, कार्यालय, पोषण आहार कक्ष, स्वच्दता गृह, मुला व मुलींसाठी व पुरुष व महिलांसाठी संडास मुतारी, पिण्याच्या पाण्याचे स्थान, भूगोल कक्ष, संगीत कक्ष, चित्रकला कक्ष, ग्रंथालय इत्यादी बाबतच्या पुरेशा सुविधा शाळेकडे उपलब्ध नाहीत. तथापी यासाठी शासनाकडून शाळेला अनुदान मिळत असूनही या सुविधा पुरेशा नाहीत असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. म्हणून या मुद्या बाबत असे दिसून येते की शाळेकडे असलेल्या सुविधांची सुची अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. मात्र शाळेला अनुदान मिळूनही सुविधा पुरेशा नसतील तर याबाबत अपीलकर्त्याने शिक्षण विभागाकडे यासाठी दाद मागणे योग्य होईल. तसेच मुद्या क्र. 8 बाबत कर्मचा—यांची सुची जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरविलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1331-1334

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1612 नाग/2010**

श्री निलेश प्रभूदयाल चौधरी
अभियंता कॉलनी, गणेशपूर भंडारा
ता. जि. भंडारा 441904 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्यचिकित्सक
सामान्य रुग्णालय, भंडारा
ता. जि. भंडारा

2) डॉ. डी. व्ही. पातुरकर
जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी,
सामान्य रुग्णालय, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता श्री निलेश प्रभूदयाल चौधरी हे स्वतः हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, भंडारा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्या अर्जामध्ये कै. पुष्पगंधा नारायण शहारे, पाठय निर्देशिका परीचारीका प्रशिक्षण केंद्र भंडारा यांचे बाबत त्यांना देय असलेल्या रकमेचे विवरणपत्र मागितलेले होते. तथापी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.10.10 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध

करुन दिला. आणि जन माहिती अधिकारी यांनी विधी व न्याय विभाग नागपूर यांचेकडून प्रस्तूत प्रकरणी त्वरीत लेखी सल्ला प्राप्त करण्याचे निर्देश देवून प्रथम अपील निकाली काढले. तथापी प्रथम अपीलाच्या नंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे आजच्या सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. डी. व्ही. पातुरकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 2.9.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की कै. पुष्पगंधा नारायण शहारे हया शासनाच्या आरोग्य विभागा अंतर्गत असणा–या भंडारा येथील परीचारीका प्रशिक्षण केंद्रात पाठय निर्देशिका या पदावर कार्यरत होत्या. सेवेत कार्यरत असतांना त्या दि. 27.7.2006 रोजी मैयत झाल्या. तथापी त्यांनी कोणत्याही प्रकारचे अधिकृत नामनिर्देशन केले नसल्यामुळे त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण तयार केलेले नाही. त्याबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला मागविण्यात आला होता. आणि विधी व न्याय विभागाने दि. 28.6.2010 रोजी वारसा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याचा सल्ला दिलेला होता. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारा खाली माहिती मागितली. त्याला अनुसरुन सदरची माहिती अपीलकर्त्यास देता येईल अगर कसे याबाबत पुन्हा विधी व न्याय विभागाचा सल्ला दि. 21.9.2010 रोजी मागीतला. तथापी आतापर्यंत विधी व न्याय विभागाचा सल्ला त्यांना मिळाला नाही.

4. मात्र प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्याचे मुळ म्हणणे असे आहे की जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जे उपलब्ध सेवा पुस्तक असेल त्या सेवा पुस्तकाच्या नोंदी वरुन रजा रोखीकरण, ग्रॅच्युईटी, गट विमा योजना आणि इतर देय रकमा हया अंदाजीत किती होवू शकतील याची माहिती न्यायालयीन कामकाजासाठी पाहिजे आहे.

5. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की कार्यालयात उपलब्ध असलेल्या सेवा पुस्तकाच्या नोंदी वरुन जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अंदाजीत स्वरुपात किती रकम होवू शकेल ती काढून देणे संयुक्तीक होईल. तथापी सेवानिवृत्ती प्रकरण महालेखाकार नागपूर यांचेकडून मंजूर झाल्यानंतरच अंतीम देय रकम निश्चित होईल असे देखील स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जातील माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सेवा पुस्तकाच्या नोंदी वरुन अंदाजीत देय रकम काढाव्यात आणि त्याची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. मात्र सेवानिवृत्ती प्रकरण महालेखाकार नागपूर यांचेकडून मंजूर झाल्यानंतरच देय रकमाची अंतीम आकडेवारी निश्चित होईल हे देखील स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1332-1334

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1611 नाग/2010**

श्री पुरुषोत्तम दशरथ चेडूके
मु. पो. नवताळा
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) श्री व्ही. जी. पचारे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत नवताळा
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की दि. 28.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत नवताळा ता. चिमूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री मनीराम शिवरकर यांचे घरापासून ते श्री मारोती मेश्रम यांचे घरापर्यंत ग्रामपंचायतने काढलेल्या रस्त्याला आलेल्या निधीची माहिती मागितलेली होती. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर दि. 24.8.2010 रोजी त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण प्राप्त झाली असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत नवताळा ता. चिमूर हे उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा दि. 28.4.2010 चा अर्ज पोस्टाने त्यांचेकडे प्राप्त झाला नव्हता. तथापी प्रथम अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांचा अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती चिमूर यांनी दि. 30.7.2010 रोजी प्रथम अपीलाच्या निर्णयासोबत दिला. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन माहिती तयार करण्यात आली आणि

अपीलकर्त्याला व्यक्तीशः माहिती पाहिजे होती म्हणून दि. 6.8.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती घेवून जाण्याबाबत पत्र पाठविण्यात आले. त्या पत्रा नुसार अपीलकर्ता त्यांचेकडे दि. 24.8.2010 रोजी हजर झाले आणि सदरची माहिती प्राप्त केली. यावर अपीलकर्त्याने आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की दि. 24.8.2010 रोजी त्यांना माहिती प्राप्त झाली परंतू त्या माहिती मध्ये श्री मारोती मेश्राम ते वासुदेव चिखलकर यांच्या घरापर्यंतर्यंतच्या रस्त्याची माहिती त्यांना मिळाली नाही. तथापी रस्त्याच्या कामाचे प्लॅन आणि एस्टीमेट त्यांना देण्यात आले होते. म्हणून अपीलकर्त्याने या रस्त्याची माहिती मागीतली असता जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर ग्रामपंचायत कार्यालयाकडे गावातील रत्याचे नोंदणी रजिस्टर नमुना नंबर 26 दाखविले. त्यातील पेज क्र. 15 वर श्री श्री मारोती मेश्राम ते वासुदेव चिखलकर घरापर्यंतयाच्या रस्त्याचा तपशिल नोंदविलिला दिसून आला म्हणून त्या रस्त्यामधील पेज क्र. 15 ची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर उपलब्ध करुन दिली आणि अपीलकर्त्याने ती झेरॉक्स प्रत स्वीकृत केली त्यामुळे अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6. 1336-1337

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1610 नाग/2010

श्री प्रकाश रामदेव जयस्वाल
जय बम्लेश्वरी कंपाऊंड जिल्हाधिकारी कार्यालया जवळ,
आमगाव रोड, फुलचूर गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया

2) श्री दिगंबर मेहरे
जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार
नगर परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2011 )**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.11.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन गट नं. 312, 313, 314 ही जमीन नगर परिषद गोंदिया यांचे साठी भूसंपादन अधिकारी यांचेकडील दि. 30.6.1961 च्या आदेशाप्रमाणे भूसंपादन केलेली होती. त्याबाबतची माहिती मागितली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 7.8.2010 रोजी असे कळविले की आपल्या माहितीच्या अर्जातील नमुद माहिती भूसंपादन प्रकरण सन 1957–1958 व सन 1961 ची असल्याने त्यासंबंधीचे जुने प्रकरण,

नस्ती या कार्यालयात उपलब्ध नसल्याने विषयांकीत माहिती पुरविता येत नाही असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दि. 10.8.2010 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र त्याचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी 30 दिवसात न देता दि. 2.2.2011 रोजी म्हणजे सुमारे 5 महिन्यानी देवून अपील खारीज केले त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमूद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया हे उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 19.7.2010 चा अर्ज त्यांचेकडे त्याच दिवशी प्राप्त झला. माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहितीचा शोध घेण्यात आला तथापी सदरचे प्रकरण सन 1957–1958 व सन 1961 चे असल्याने त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र नगर परिषदेत आज उपलब्ध झालेले नाही. म्हणून अपीलकर्त्यास दि. 7.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली नाही असे कळविण्यात आले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असेही नमुद केले की सदरचे प्रकरण हे सुमारे 50 वर्षापूर्वीचे आहे. त्यामुळे त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने मागीतलेले गट नं. 312, 313, 314 हे नगर परिषदेच्या ताब्यात देखील नाही त्यामुळे या गट नंबरची कोणतीही माहिती नगर परिषदेकडे उपलब्ध नाही.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्या वतीने श्री सहा. जन माहिती अधिकारी श्री रंगारी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि निर्णय दि. 2.2.2011 रोजी देण्यात आला. सदरच्या अपीलाचा निर्णय 5 महिन्याच्या विलंबाने घेण्यात आल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे 30 दिवसाच्या आत निर्णय देणे आवश्यक असते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी निर्णय सुमारे 5 महिन्याने उशिराने दिलेला दिसून येतो. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) चे उल्लंघन केल्याचे दिसून येते. त्यासाठी भविष्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये अशी सक्त ताकीत त्यांना देण्यात येत आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती ही सुमारे 50 वर्षापूर्वीची आहे. त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र जन माहिती

अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.8.2010 च्या पत्राने कळविल्याचे दिसून येते. तसेच अपीलकर्त्याने ज्या गट नंबरची माहिती मागीतलेली आहे ते गट नंबर आज रोजी नगर परिषदेच्या ताब्यात देखील नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमूद केले. त्यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध होवू शकत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1339-1341

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1619 नाग/2010

श्री अरुण खुशाल नैताम
मु. पो. खरपुडी
ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जा. सा. लाड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य
शासकीय विज्ञान महाविद्याल गडचिरोली
ता. जि. गडचिरोली

2) श्री डी. जे. इलपाची
जन माहिती अधिकारी वरीष्ठ लिपीक
शासकीय विज्ञान महाविद्याल गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.8.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जन माहिती अधिकारी शासकीय विज्ञान महाविद्याल गडचिरोली यांचेकडे महाविद्यालयाच्या बाबतीत एकुण 1 ते 16 मुद्यांची माहिती मागितलेली होती. आणि सदरच्या माहितीचा कालावधी हा सन 2002 ते 2010 चा होता. अर्जाच्या अनुषंगाने माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे माहिती पुरविण्यास वेळ लागेल म्हणून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.8.2010 च्या पत्राप्रमाणे दि. 15.9.2010पर्यंत माहिती देण्यात येईल असे कळविलेले होते. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी

दि. 18.9.2010 च्या पत्रान्वये त्यांना एकुण 1 ते 16 मुद्यांची उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती ही अपूर्ण आणि चुकीची आहे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 2.8.2010 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झला. अपीलकर्त्याने एकुण 1 ते 16 मुद्यांची माहिती मागितलेली होती. आणि माहितीचा कालावधी हा सन सन 2002 ते 2010 असा सुमारे 8 वर्षाचा होता म्हणून माहितीची व्यप्ती मोठी असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 17.8.2010 च्या पत्रान्वये दि. 15.9.2010पर्यंत सदरची माहिती देण्यात येईल असे कळविलेले होते. त्यानंतर अपीलकर्त्याने मुद्येनिहाय माहिती काढण्यात आली आणि सदरची माहिती दि. 18.8.2010 च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे आयोगा समोर त्यांनी मान्य केले. मात्र त्यांनी देखील सुनावणीत असे सांगितले की सदरची माहिती ही अपूर्ण स्वरुपात असून चुकीची आहे. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती आयोगा समोर मुद्येनिहाय देण्यात आली. त्यामध्ये असे दिसून आले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 1 ते 16 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी मुद्या क्र. 3,4,4,8,9,14 याची माहिती दिलेली नाही. परंतू अपीलकर्त्यास माहिती संबंधात त्याचे कोटेशन व बिले यांच्या सत्यप्रती त्यांना पाहिजे आहे म्हणून अपीलकर्त्याने हया मुद्यांचे मागितलेले बिले आणि कोटेशन त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे मुद्या क्र. 3,4,4,8,9,14 ची बिले आणि कोटेशन उपलब्ध

करुन द्यावे. कोटेशन उपलब्ध नसल्यास त्यांना स्पष्टपणे तसे कळवावे. सदरची माहिती अपीलकर्त्याने माहितीची फी भरल्यानंतर त्वरीत उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1341-1343

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1610 नाग/2010**

श्री प्रकाश रामदेव जयस्वाल
जय बम्लेश्वरी कंपाऊंड जिल्हाधिकारी कार्यालया जवळ,
आमगाव रोड, फुलचूर गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया

2) श्री दिगंबर मेहरे
जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार
नगर परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.11.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन गट नं. 312, 313, 314 ही जमीन नगर परिषद गोंदिया यांचे साठी भूसंपादन अधिकारी यांचेकडील दि. 30.6.1961 च्या आदेशाप्रमाणे संपादन केलेली होती. त्याबाबतची माहिती मागितली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 7.8. 2010 रोजी असे कळविले की आपल्या माहितीच्या अर्जातील नमुद माहिती भूसंपादन प्रकरण सन 1957–1958 व सन 1961 ची असल्याने त्यासंबंधीचे जुने प्रकरण,

नस्ती या कार्यालयात उपलब्ध नसल्याने विषयांकीत माहिती पुरविता येत नाही असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दि. 10.8.2010 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र त्याचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी 30 दिवसात न देता दि. 2.2.2011 रोजी म्हणजे सुमारे 5 महिन्यानी देवून अपील खारीज केले त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमूद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया हे उपस्थित होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 19.7.2010 चा अर्ज त्यांचेकडे त्याच दिवशी प्राप्त झला. माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहितीचा शोध घेण्यात आला तथापी सदरचे प्रकरण सन 1957–1958 व सन 1961 चे असल्याने त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र नगर परिषदेत आज उपलब्ध झालेले नाही. म्हणून अपीलकर्त्यास दि. 7.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली नाही असे कळविण्यात आले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असेही नमुद केले की सदरचे प्रकरण हे सुमारे 50 वर्षापूर्वीचे आहे. त्यामुळे त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने मागीतलेले गट नं. 312, 313, 314 हे नगर परिषदेच्या ताब्यात देखील नाही त्यामुळे या गट नंबरची कोणतीही माहिती नगर परिषदेकडे उपलब्ध नाही.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्या वतीने श्री सहा. जन माहिती अधिकारी श्री रंगारी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि निर्णय दि. 2.2.2011 रोजी देण्यात आला. सदरच्या अपीलाचा निर्णय 5 महिन्याच्या विलंबाने घेण्यात आल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे 30 दिवसाच्या आत निर्णय देणे आवश्यक असते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी निर्णय सुमारे 5 महिन्याने उशिराने दिलेला दिसून येतो. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) चे उल्लंघन केल्याचे दिसून येते. त्यासाठी भविष्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये अशी सक्त ताकीत त्यांना देण्यात येत आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती ही सुमारे 50 वर्षापूर्वीची आहे. त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र जन माहिती

अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.8.2010 च्या पत्राने कळविल्याचे दिसून येते. तसेच अपीलकर्त्याने ज्या गट नंबरची माहिती मागीतलेली आहे ते गट नंबर आज रोजी नगर परिषदेच्या ताब्यात देखील नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमूद केले. त्यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध होवू शकत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1339-1341

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1619 नाग/2010

श्री अरुण खुशाल नैताम
मु. पो. खरपुडी
ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जा. सा. लाड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य
शासकीय विज्ञान महाविद्याल गडचिरोली
ता. जि. गडचिरोली

2) श्री डी. जे. इलपाची
जन माहिती अधिकारी वरीष्ठ लिपीक
शासकीय विज्ञान महाविद्याल गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.8.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जन माहिती अधिकारी शासकीय विज्ञान महाविद्याल गडचिरोली यांचेकडे महाविद्यालयाच्या बाबतीत एकुण 1 ते 16 मुद्यांची माहिती मागितलेली होती. आणि सदरच्या माहितीचा कालावधी हा सन 2002 ते 2010 चा होता. अर्जाच्या अनुषंगाने माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे माहिती पुरविण्यास वेळ लागेल म्हणून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.8.2010 च्या पत्राप्रमाणे दि. 15.9.2010पर्यंत माहिती देण्यात येईल असे कळविलेले होते. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी

दि. 18.9.2010 च्या पत्रान्वये त्यांना एकुण 1 ते 16 मुद्यांची उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती ही अपूर्ण आणि चुकीची आहे असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 2.8.2010 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झला. अपीलकर्त्याने एकुण 1 ते 16 मुद्यांची माहिती मागितलेली होती. आणि माहितीचा कालावधी हा सन सन 2002 ते 2010 असा सुमारे 8 वर्षाचा होता म्हणून माहितीची व्यप्ती मोठी असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 17.8.2010 च्या पत्रान्वये दि. 15.9.2010पर्यंत सदरची माहिती देण्यात येईल असे कळविलेले होते. त्यानंतर अपीलकर्त्याने मुद्येनिहाय माहिती काढण्यात आली आणि सदरची माहिती दि. 18.8.2010 च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे आयोगा समोर त्यांनी मान्य केले. मात्र त्यांनी सुनावणीत असे सांगितले की सदरची माहिती ही अपूर्ण स्वरुपात असून चुकीची आहे. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती आयोगा समोर मुद्येनिहाय दाखविण्यात आली. त्यामध्ये असे दिसून आले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 1 ते 16 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी मुद्या क. 3,4,5,8,9,14 याची माहिती अपूर्ण दिलेली आहे. तसेच अपीलकर्त्यास माहिती संबंधात त्याचे कोटेशन व बिले यांच्या सत्यप्रती त्यांना पाहिजे आहे म्हणून अपीलकर्त्याने हया मुद्यांचे मागितलेले बिले आणि कोटेशन त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे मुद्या क. 3,4,5,8,9,14 ची बिले आणि कोटेशन उपलब्ध

करुन द्यावे. कोटेशन उपलब्ध नसल्यास त्यांना स्पष्टपणे तसे कळवावे. सदरची माहिती अपीलकर्त्याने माहितीची फी भरल्यानंतर त्वरीत उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1341-1343

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1620 नाग/2010

श्री प्रशांत पुंडलिकराव भेंडे
रा. हिंगणघाट संत ज्ञानेश्वर वार्ड(रिठे कॉलनी)
लक्ष्मी मंगल कार्यालयाचे मागे,
मु. पो. ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. दैणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांच्या वतीने ॲड. शेंडे यांनी त्यांची बाजू मांडली. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणघाट यांच्या कार्यालयाकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली दि. 18.8.2010 रोजी अर्ज सादर करुन मा. तहसिलदार हिंगणघाट यांचे पत्र क्र. राजस्व/एलएनडी 30/2008–2009 आदेश दि. 5.1.2009 आदेशाची प्रत व सदर केस मध्ये घेतलेल्या सर्व व्यक्तीच्या बयाणाच्या प्रती आणि त्या संदर्भात केलेल्या फेरफाराच्या प्रती इत्यादीच्या एकुण 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांचेकडे दाखल केल्याचे नमुद केले. तसेच अपूण माहिती दिल्यामुळे व माहिती मुदतीत न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी याचेवर कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांच्या वकीलानी सुनावणीत सांगितले.

2. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीच्या अधिकारा खालचा अर्ज प्राप्त झाला त्यावेळेला जन माहिती अधिकारी म्हणून तहसिलदार होते. त्यामुळे तहसिलदार यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जातली मुद्या क्र. 3 ची माहिती तलाठी बोरगाव (दा.) यांचेशी संबंधीत असल्याने तलाठी बोरगाव (दा.) यांचेकडून मागीतली होती सदर माहिती दि. 23.8.2010 रोजी प्राप्त झाला. तसेच मुद्या क्र. 1,2 आणि 4 बाबत कार्यालयात माहितीचा शोध घेण्यात आला आणि ती माहिती तयार करण्यात आली आणि माहिती तयार झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 14.10.2010 च्या पत्राने दि. 18.8. 2010 ला कार्यालयात हजर राहून माहितीची फी भरुन माहिती घेवून जाण्याबाबत कळविण्यात आले. तथापी अपीलकर्ता कार्यालयात फी भरण्यासाठी आले नाहीत म्हणून दि. 18.11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास यु.पी.सी.ने सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली त्या माहितीचे एकुण 24 पाने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलीत. अपीलकर्त्याच्या वकीलांनी याबाबत असे नमुद केले की त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती प्राप्त झाली मात्र त्यांना माहिती अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे सर्वच माहिती दिली नाही. जी माहिती मिळाली नाही ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली ती अपीलकर्त्याने स्वीकारली. मात्र त्यामध्ये अपीलकर्त्याचे बयाण आणि त्यांनी दिलेले लेखी निवेदन तसेच श्री नौकरकार यांचे बयाण त्यांना प्राप्त झालेले नाहीत. म्हणन आजच्या सुनावणीस उपविभागीय अधिकारी हिंगणघाट हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याला पुन्हा त्यांचे बयाण व त्यांचे लेखी निवेदन तसेच श्री नौकरकार यांचे बयाण इत्यादींचे केस पेपर्स जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली.

3. तसेच अपीलकर्त्याच्या दि. 18.8.2010 च्या अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणघाट यांनी दि. 18.11.2010 च्या पत्रान्वये विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून याबाबत अपीलकर्त्यास विलंबाने का माहिती पाठविली याचा त्यांचेकडून खुलासा घेणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या बयाणाच्या प्रती तसेच त्यांनी दिलेले लेखी निवेदन तसेच श्री नौकरकार यांचे बयाणाच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्त्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणघाट यांनी दि. 18.8.2010 च्या अर्जाला अनुसरुन दि. 18.11.2010 च्या पत्राद्वारे

माहिती उपलब्ध करुन दिली म्हणजे सुमारे 3 महिने उशिराने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात का विलंब झाला याबद्यल तहसिलदार हिंगणघाट यांनी आयोगाकडे हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत खुलासा करावा अन्यथा त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 20 (1) प्रमाणे शास्तीची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1343-1345

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1621 नाग/2010**

श्री अरुणकुमार कृष्णरावजी बालपांडे
श्रीमती सुभद्राबाई लेंडे समृती निवास, खदान हंसापूरी, नागपूर
ता. जि. नागपूर – 440418 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
0
2) श्री सपाटे
जन माहिती अधिकारी तथा नझुल नायब तहसिलदार
नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.11.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी नझुल विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे दि. 17.8.2010 रोजी मेयो हॉस्पीटल कंपाऊंड येथील दुकान तोडल्याने त्यांच्या पुनर्वसन अर्जावर कोणती कारवाई करण्यात आली याची माहिती मागितलेली होती. अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.9.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांचेकडून अपूर्ण माहिती उपलब्ध झाली म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 20.9.2010 रोजी प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 22.11.10 रोजी देण्यात आला आणि त्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांचे अपील खारीज केले. म्हणून त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. तसेच अपीलकर्ता यांनी आयोगा समोर असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 13.9.2010 च्या पत्राने असे उत्तर दिले की मेयो हॉस्पीटल लगत परीसरातील रस्ता रुंदीकरणात तोडण्यात आल्याने गाळे धारकांचे पुनर्वसन करण्याबाबत मेयो हॉस्पीटल कंपाऊंड जनरल मर्चंट असोसिऐशन यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे रीट याचीका दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशा नुसार याचिकाकर्त्याच्या पुनर्वसनाबाबत मौजा भानखेडा येथील जागा मंजूर करण्यात आली आहे ती जागा असोसिऐशनला दि. 17.82008 ला ताब्यात दिलेली आहे. असोसिऐशनने सदर जागेवर बांधकाम केल्यानंतर नियमानुसार गाळयाचे वाटप करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. मात्र या याचिकेत अपीलकर्ता यांचा समावेश नव्हता असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे दि. 18.82010 रोजी पुनर्वसनाच्या केलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली याची त्यांना माहिती पाहिजे होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.82010 च्या त्यांच्या अर्जावर केलेली कार्यवाही त्यांना कळविलेली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नझुल नायब तहसिलदार नागपूर हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 13.9.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या अर्जाच्या अनुषंगाने मेयो हॉस्पीटल कंपाऊंड जनरल मर्चंट असोसिऐशन यांना दुकानाचे वाटपाकरीता 1864 मिटर जागेचा ताबा देण्याची कार्यवाही केलेली असून सदर जागेवर गाळयाचे बांधकाम केल्यानंतर नियमानुसार वाटप करण्यात येईल अशी माहिती अर्जदारास दि. 13.9.2010 च्या पत्राने दिलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दुकानाच्या पुनर्वसनाबाबत त्यांनी जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे दि. 17.82010 रोजी दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली याची त्यांना माहिती पाहिजे आहे. म्हणून त्यांचा दि. 17.82010 चा जो अर्ज आहे त्या अर्जाच्या संदर्भात झालेली कार्यवाही उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे म्हणून ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.8.2010 च्या मुळ अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी यक्तीशः हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदर माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1347-1349

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1622 नाग/2010**

श्री डॉ. किसन हनुजी जांभुळकर
माता टेकडी, इंदोरा, पो.बंझनबाग,
नागपूर
ता. जि. नागपूर – 4 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
राज्य उत्पादन शुल्क, नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिव्हील लाईन्स नागपूर
2) श्री सी. आर. वाघ
जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक
राज्य उत्पादन शुल्क, नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिव्हील लाईन्स नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.2.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी दि. 31.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांच्या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्रीमती कौसल्याबाई ताराचंद साखरे अनुज्ञप्ती धारक गडीगोदाम नागपूर यांचे देशी दारुचे दुकान स्लम एरीयात असल्यामुळे इतरत्र स्थलांतर करण्याबाबत मुद्या क्र. A B C D E F G H I अशा 9 मुद्यांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीची फी भरण्याचे फी चे दि. 20.5.2010 चे पत्र मिळाले. त्याप्रमाणे त्यांनी दि. 26.5.2010 रोजी माहितीची फी भरली आणि माहितीची फी भरल्या नंतर दि. 28.5.2010 रोजी त्यांना एकुण 32 पानाची माहिती पुरविण्यात आली मात्र सदरच्या माहिती मध्ये त्यांना पाहिजे असलेली माहिती मिळाली नाही. प्रामुख्याने

त्यांना दारुच्या दुकानाबाबत बिल्डींगच्या मालकाशी केलेल्या करारपत्राची प्रत तसेच दुकानाचे भाडे पावती इत्यादीची माहिती त्यांना मिळाली नाही. कारण सदरचे दुकान त्यांना मंजूर करतांना त्यांनी दाखविलेल्या जागेचे कागदपत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविणे अपेक्षित आहे. म्हणून या कागदपत्राची त्यांना आवश्यकता आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की सदरचे दारुचे दुकान हे स्लम एरीयात असल्यामुळे Mahrashtra Slum Area Act 1971 मधील कलम 34 नुसार दुकान तिथून इतरत्र हलविणे आवश्यक होते. सदरचे दारुचे दुकान हे स्लम एरीया मधून हटवावे म्हणून नागपूर महानगर पालिकेच्या सक्षम अधिका–याने दि. 14.8.2008 रोजी आदेश पारीत केलेले असून त्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांचेकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविलेली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय त्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करीत नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 21.4.2010 रोजीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 23.4.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी त्यांचे कार्यालयातील मुद्या क्र. D E F G H I अशा 6 मुद्यांची माहिती विहित मुदतीत म्हणजे दि. 28 मे 2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. तथापी मुद्या क्र. A B C याबाबतची माहिती सुमारे 36 वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे ती माहिती पुरविता येत नाही असे अपीलकर्त्यास दि. 28.5.2010 च्या पत्रामध्ये कळविलेले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आणखी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्यास माहितीच्या अधिकारा अंतर्गत श्रीमती कौसल्याबाई ताराचंद साखरे अनुज्ञप्ती धारक गडीगोदाम नागपूर यांचे देशी दारुचे दुकान स्लम एरीयात असल्यामुळे इतरत्र स्थलांतर करुन पाहिजे आहे. तसेच जागा मालक व अनुज्ञप्ती धारक यांच्यातील वाद हे त्यांचे अंर्गत वाद असून महाराष्ट्र देशी दारु नियम 1973 अंतर्गत ही बाब येत नसल्यामुळे त्या वर कार्यवाही करण्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाचा संबंध येत नाही तसेच महानगर पालिकेच्या सक्षम अधिका–याने स्लम एरीयातून दारुचे दुकान स्थलांतर करण्याबाबत जे आदेश पारीत केलेले आहेत ते आदेश अनुज्ञप्ती धारक यांना थेट उद्येशून आहे. त्यावर कार्यवाही अनुज्ञप्ती धारक यांनी स्वतः करावयाची आहे त्या कार्यवाहीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्षम अधिकारी नाहत. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या अपेक्षेप्रमाणे सदर दुकानाचे स्थलांतर करणे किंवा नुतनीकरण न करणे याचा प्रश्नच उदभवत नाही.

4. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दि. 28 मे 2010 च्या पत्राने मुद्या क्र. D ते I या संदर्भातील एकूण 6 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मुद्या क्र. A ते C ही माहिती 36 वर्षापूर्वीहून अधिक कालावधीची

असल्यामुळे या संदर्भातील अभिलेख Bombay Excise Manual Volume II भाग 4 मधील तरतुदीनुसार 'ब' वर्गीय असून तो 30 वर्षानी नाश पावण्यास पात्र आहे. त्यामुळे सदरची महिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. तथापी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली आहे. तसेच दारुचे दुकान स्थलांतर होण्यासाठी योग्य त्या प्राधिकरणाकडे अपीलकर्त्याने दाद मागणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1351-1353

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1628 नाग/2010**

श्री जगदिश साहेबराव इटनकर
प्लॉट नं. 4 न्यु बिडीपेठ, नागपूर
ता. जि. नागपूर – 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री भलावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,
नागपूर वन विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री व्ही. एस. उमाळे
जन माहिती अधिकारी तथा वनपरीक्षेत्र अधिकारी,
नरखेड वनपरीक्षेत्र नरखेड
ता. नरखेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली दि. 31.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा वनपरीक्षेत्र अधिकारी, नरखेड यांचे कार्यालयाकडे अर्ज सादर करुन वनपरीक्षेत्र अधिकारी, नरखेड यांचे कार्यालयाने वन संरक्षक नागपूर वन विभाग नागपूर यांचेकडे पाठविलेले पत्र क्र. 145 दि. 31.5.2006 आणि पत्र क्र. 527 दि. 31.6.2006 ही दोन पत्रे पाठविलेली आहेत त्यांच्या छायांकीत प्रती अपीलकर्ता यांनी मागितलेल्या होत्या. तथापी अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.9.10 रोजी देण्यात आला. आणि

अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या माहितीचा शोध घेवून जन माहिती अधिकारी यांनी 7 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्या निर्णयात नमुद केले. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर देखील माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा वनपरीक्षेत्र अधिकारी, नरखेड श्री व्ही. एस. उमाळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, नागपूर वन विभाग, नागपूर हे सुध्दा उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 21.6.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 28.6.2010 रोजी प्राप्त झला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या संपूर्ण रेकॉर्डची पाहणी केली. तथापी अपीलकर्त्याने मागणी केलेली दोन्ही पत्रे रेकॉर्ड मध्ये उपलब्ध झालेले दिसून आले नाही. तसेच सुनावणीच्या दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की वनपरीक्षेत्र अधिकारी, नरखेड हे कार्यालय अस्तित्वात येण्यापूर्वी वनपरीक्षेत्र अधिकारी हे कार्यालय काटोल येथे कार्यरत होते. जुन 2006 च्या दरम्यान काटोल वनपरीक्षेत्राचे विभाजन होवून वनपरीक्षेत्र अधिकारी, नरखेड हे कार्यालय स्वतंत्रपणे अस्तित्वात आले. त्यामुळे काटोल कार्यालयाकडून नरखेड कार्यालयाशी संबंधीत असलेल्या सर्व नस्त्या जुन 2006 च्या दरम्यान नरखेड कार्यालयात आल्या. काटोल कार्यालयाकडून आलेल्या सर्व नस्त्यांचे पाहणी करण्यात आली. तथापी अपीलकर्त्याना पाहिजे असलेल्या माहितीची नस्ती उपलब्ध झालेली नाही तसेच पुन्हा या नस्तीचा कसून शोध घेण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत लिपीक श्री लंगडे यांना आदेश देवून त्या दस्तऐवजाची पाहणी करण्याच्या सुचना दिल्या त्यांनी देखील त्या दस्तऐवजाची पाहणी केली. मात्र त्यांनी दि. 7.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अहवाल देवून अपीलकर्त्याने मागीतलेल्या माहितीची नस्ती उपलब्ध होत नाही असा लेखी अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या आधारे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 9.8.2010 च्या पत्राने त्यांनी मागीतलेल्या माहितीची नस्ती मिळत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागीतलेल्या वरील दोन पत्राच्या प्रती वन संरक्षक नागपूर या कार्यालयाकडे देखील शोधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्या कार्यालयाकडे देखील या प्रती उपलब्ध झाल्या नाहीत म्हणून वन संरक्षक नागपूर या कार्यालयाने दि. 3.7.2010 रोजी वनपरीक्षेत्र अधिकारी, नरखेड यांना तसे कळविलेले दिसून येते. सुनावणीच्या दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागीतलेले पत्र क्र. 145 दि. 31.5.2006 आणि पत्र क्र. 527 दि. 31.6.2006 याचा शोध त्याच्या कार्यालयाकडील जावक नोंदवही मध्ये घेतला असता असे दिसून येते की सदरची दोन्ही पत्रे वन संरक्षक नागपूर यांचे कार्यालयाकडे जावक

करुन पाठविलेले आहेत. मात्र त्यामध्ये पत्र क. 527 दि. 31.6.2006 हे त्यांच्या कार्यालयाने वायरलेस नेटवर्क संदर्भात अहवाल पाठविल्याचे दिसून येते. म्हणजे सदरचे पत्र हे अपीलकर्त्याशी संबंधीत दिसून येत नाही आणि पत्र क. 145 दि. 31.5.2006 हे माहे मे 2006 चा पगार न काढण्याबाबत असल्याचे दिसून येते. तथापी या दोन्ही पत्राचा शोध घेवून ती माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे जावक नोंदवही मध्ये ज्या पत्राच्या नोंदी केलेल्या आहेत त्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या दोन्ही पत्रांच्या संदर्भात जावक नोंद वहीतील नोंदी बाबतची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1355-1357

जा.क.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1627 नाग/2010**

श्री राजा खान महेबुब खान
द्वारा– डायमंड गॅस हाऊस, शॉप नं. 5,
छोटी मस्जीद कॉम्प्लेक्स, सदर बाजार, नागपूर
ता. जि. नागपूर –01 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उद्योग सहसंचालक,
नागपूर विभाग नागपूर
2 रा माळा, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर

2) श्री विजय अलोणे
जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्या. नागपूर
शक्ती ऑफसेट जवळ, वर्धा रोड, रामदासपेठ नागपूर 12

3) श्री गिरीश उमप
जन माहिती अधिकारी तथा महा व्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर
2 रा माळा, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की जन माहिती अधिकारी तथा महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर यांच्या कार्यालयाकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली दि. 1.9.2010 रोजी अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे 2 मुद्यांची माहिती मागितलेली होती.

1. शासन परीपत्रक क्र. कोळसा09/प्रक29/उद्योग–7 उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परीपत्रक दि. 7.11.2009 नुसार जिल्हा उद्योग घटकांना व विटभट्टी धारकांना लागणा–या कोळशाची शिफारस व निर्धारण करण्यात आलेल्या समितीच्या शिफारस पत्राच्या सत्यप्रती

2. उपरोक्त शासन परीपत्रक नियम 5–6 नुसार नियुक्त समितीने उद्योग घटकांनी वापरलेल्या कोळशाच्या दर तीन महिन्यानी आजपर्यंत मितीने वेळोवेळी तपासणी करुन शासनास सादर केलेल्या तपासणी अहवालाच्या सत्यप्रती.

3. वरील प्रमाणे दोन मुद्यांची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती. तथापी अपीलकर्ता यांना दि. 13.9.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर यांनी कळविले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसून विभागीय अधिकारी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर हया कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील उद्योग सहसंचालक, नागपूर यांचेकडे दि. 23.9.2010 रोजी दाखल केले. तथापी त्या प्रथम अपीलाला अनुसरुन उद्योग सहसंचालक, नागपूर यांनी त्यांच्याकडील दि. 20.10.2010 च्या पत्राने असे कळविले की महाराष्ट्र शासनाच्या वतीने कोलची शिफारस करण्याकरीता व निर्धारण करण्याकरीता तसेच वाटप करण्याकरीता महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर हया संस्थेला अधिकृत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाने ज्या दोन समित्या नेमलेल्या आहेत त्याचे कामकाजाचा सर्व रेकॉर्ड विभागीय अधिकारी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर यांचेकडे उपलब्ध असते म्हणून आपण ती माहिती घेण्यासाठी विभागीय अधिकारी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर या कार्यालयाशी संपर्क साधावा असे अपीलकर्त्यास उद्योग सहसंचालक, नागपूर यांनी कळविले. त्याला अनुसरुन अपीलकर्ता यांनी दि. 15.11.2010 रोजी विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर यांना पत्र पाठवून माहिती पुरविण्याची विनंती केली. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 30.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर श्री गिरीश उमप हे उपस्थित होते. तसेच उद्योग सहसंचालक, नागपूर या पदाचा पदभार त्यांचेकडेच असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून देखील तेच उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 1.9.2010 रोजी प्राप्त झला. त्या माहिती अर्जाला अनुसरुन यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र यांनी अपीलकर्त्यास दि. 13.9.2010 च्या पत्राने कळविले की आपण माहितीच्या अधिकारा अंतर्गत कोळसा शिफारस बाबत मागितलेली माहिती या कार्यालयाशी संबंधीत नसून विभागीय अधिकारी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग

विकास महामंडळ नागपूर यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले होते त्या अपीलाला अनुसरुन देखील अपीलकर्ता यांनी दि. 20.11.2010 रोजी त्यांनी मागितलेली माहिती विभागीय अधिकारी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे त्यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे आयोगासमोर सांगितले. त्याचप्रमाणे महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर यांनी आयोगासमोर सुनावणीत असेही सांगितले की महाराष्ट्र शासनाच्या वतीने कोलची शिफारस करण्याकरीता व निर्धारण करण्याकरीता तसेच वाटप करण्याकरीता महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर हया संस्थेला अधिकृत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाने ज्या दोन समित्या नेमलेल्या आहेत त्याचे कामकाजाचा सर्व रेकॉर्ड विभागीय अधिकारी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर यांचेकडे उपलब्ध असतो. तसेच नागपूर जिल्हा उद्योग घटकांना व विटभट्टी धारकांना लागणा–या कोळशाची शिफारस पत्रे व कोळसा निर्धारण पत्रे हे सर्व रेकॉडे महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर यांचे कार्यालयात आहे त्यामुळे अपीलकर्त्याने विभागीय अधिकारी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर यांचेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविण्यात आल्याचे त्यांनी नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने शासनाकडील वर नमुद केल्याप्रमाणे उद्योग उर्जा व कामगार विभागाचे दि. 7.11.2009 च्या परीपत्रकाप्रमाणे दोन मुद्यांची माहिती मागितलेली आहे. या परीपत्रकाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की उद्योग घटकांना लागणा–या कोळशाचे निर्धारण करण्यासाठी जिल्हा समिती नियुक्त केली असून महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र हे या समितीचे अध्यक्ष आहे त्यांच्या अध्यक्षतेखालीच याबाबतची शिफारस होत असते तसेच वितरीत केलेल्या कोळशाच्या वापरा बाबत जी तपासणी समिती आहे त्यामध्ये देखील महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र हे आहेत. त्यामुळे या दोन्ही समितीच्या निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग दिसून येतो म्हणून सदरची माहिती त्यांचेशी संबंधीत नाही हे म्हणणे योग्य दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदरची माहिती महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर यांनी संबंधीत कार्यालयाकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी दि. 1.9.2010 च्या माहितीच्या अधिकारा खाली मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध न झाल्यास महा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंन्द्र नागपूर यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1355-1358

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1641 नाग/2010**

श्री प्रकाश रामकृष्णाजी वाकोडे
मु. वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री एस. पी. पाटील
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक(उप अधिक्षक)
भूमी अभिलेख कार्यालय सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक(उप अधिक्षक) भूमी अभिलेख कार्यालय सावनेर यांच्या कार्यालयाकडे मौजा वाकी व कोस डोंगरी येथील 1 ते 5 प्रकरणाच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या होत्या. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांस जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.8.2010 च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली मात्र त्या माहिती मध्ये ख. नं. 259 आणि ख. नं. 79 याबाबतची कागदपत्रे त्यांना मिळाली नाहीत. म्हणून त्यांनी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते.

सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 8.11.10 रोजी देण्यात आला. त्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक(उप अधिक्षक) भूमी अभिलेख कार्यालय सावनेर यांनी अपीलकर्त्यास दि. 22.6.2010 व 27.7.2010 च्या अर्जा प्रमाणे मुळ कागदपत्र पाहून आवश्यक कागदपत्राच्या प्रती नियमाप्रमाणे फी चा भरणा करुन द्याव्यात म्हणून आदेश दिलेले होते. तसेच उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय सावनेर यांनी अपीलकर्त्यास पाहणीसाठी धारीका उपलब्ध करुन देवून त्यांना आवश्यक कागदपत्र पुरविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अपीलकर्ता जन माहिती अधिकारी कार्यालयात धारीका पाहण्यासाठी गेले मात्र त्यांना धारीका पाहणीसाठी मिळाले नाहीत म्हणून त्यांना कागदपत्र उपलब्ध झाले नाहीत असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सावनेर श्री एस. पी. पाटील हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री पी. टी. भूते हे सुनावणीस उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सावनेर यांनी आयोगा समोर असे नमुद केले की प्रथम अपीलाचा निर्णय दि. 8.11.10 रोजी देण्यात आला. त्या निर्णयानुसार अपीलकर्ता यांना दि. 22.6.2010 व 27.7.2010 च्या अर्जा प्रमाणे धारीका पाहण्यासाठी उपलब्ध करुन देवून आवश्यक ते कागदपत्र त्यांना पुरविण्याचे आदेश प्रथम अपीलात दिलेले होते. मात्र सदरच्या धारीका हया जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचे कार्यालयाकडून त्यांचे कार्यालयाकडे अद्याप प्राप्त झालेल्या नाहीत म्हणून अपीलकर्त्यास त्या धारीका पाहण्यासाठी उपलब्ध करुन देता आल्या नाहीत. तथापी आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री पी. टी. भूते हे उपस्थित होते. त्यांनी सांगितले की अपीलकर्त्याच्या संबंधातील दोन्ही धारीका हया दि. 7.2.2011 रोजी पोस्टाने उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय सावनेर यांचे कार्यालयाकडे पाठविलेल्या आहेत त्या 2/3 दिवसात पोस्टाने त्यांना उपलब्ध होतील. म्हणून हया धारीका जन माहिती अधिकारी सावनेर यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाल्या नंतर अपीलकर्ता यांना त्या पाहण्यासाठी त्वरीत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी सावनेर यांचे कार्यालयाकडे जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचे कार्यालयाकडून धारीका प्राप्त झाल्या नंतर 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या कार्यालया हया धारीकेची पाहाणी करण्यासाठी बोलवावे आणि प्रथम अपीलातील निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांनी धारीकेचे निरीक्षण केल्यानंतर त्यांच्या कडून नियमाप्रमाणे फी चा भरणा करुन घेवून त्यांना आवश्यक कागदपत्रे त्वरीत पुरवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1360-1362

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1640 नाग/2010**

श्री रामदास मुकुंदा ठाकरे
मु. कोलार पो. बुटीबोरी
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. आर. उरकुडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री डी. बी. बोरकर अव्वल कारकून
जन माहिती अधिकारी
जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दि. 28.1.2010 रोजी अर्ज सादर करुन कोलार तालुका नागपूर गावाचे पुनर्वसन 1997 मध्ये झालेले आहे त्याबाबत 1 ते 6 मुद्यांची माहिती मागितलेली होती. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांस दि. 15.1.2011 रोजी नायब तहसिलदार नागपूर ग्रामीण यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती अपूर्ण असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा पुनर्वसन अधिकारी नागपूर यांचे कार्यालयाकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी झाली नाही आणि प्रथम अपीलाचा निर्णय देखील प्राप्त झाला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय श्री डी. बी. बोरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्री व्ही. आर. उरकुडे हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तहसिलदार यांच्या स्तरावरील असल्यामुळे सदरचा अर्ज दि. 1.2.2010 रोजी तहसिलदार हिंगणा यांचे कार्यालयाकडे अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यासाठी पाठविण्यात आला होता. मात्र तहसिलदार हिंगणा यांनी त्यांच्या कडील दि. 18.2.2010 च्या पत्राने असे कळविले की सदर माहिती तहसिलदार नागपूर ग्रामीण यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी तो अर्ज परत केला म्हणून जन माहिती अधिकारी यांनी सदरचा अर्ज तहसिलदार नागपूर ग्रामीण आणि उपविभागीय नागपूर यांचेकडे दि. 24.2.2010 च्या पत्राने पाठविला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 14 वर्षापूर्वीची असल्यामुळे त्या माहितीचा शोध तहसिलदार नागपूर ग्रामीण यांच्या स्वतरावर घेण्यात आला. आणि त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दि. 15.1.2011 रोजी अपीलकर्त्यास पाठविली. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले मात्र सदरची माहिती अपूर्ण आहे त्या माहिती मध्ये ज्या लोकांना प्लॉट वाटप झाले आहे त्या सर्वांची माहिती त्यामध्ये नाही असे त्यांनी आयोगा समोर सांगितले.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी देखील सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा अपील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे आठ महिने उशिराने म्हणजे दि. 22.9.2010 रोजी दाखल झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तहसिलदार नागपूर ग्रामीण यांचेशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेशी पत्रव्यवहार करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत तहसिलदार नागपूर यांचेकडे दि. 12.1.2011 आणि दि. 18.1.2011 रोजी पत्र पाठविले होते. त्यानुसार नायब तहसिलदार नागपूर ग्रामीण यांनी अपीलकर्त्यास दि. 15.1.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही.

5. आजच्या सुनावणीस अपीलकर्त्यास जी माहिती प्राप्त झाली आहे ती अपूर्ण आहे म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी नागपूर यांनी त्यांचे कार्यालयामध्ये प्रथम अपीलाच्या सुनावणीसाठी सर्व संबंधीतांना बोलावून अपीलकर्त्याला जी माहिती पाठविलेली आहे आणि जी माहिती अद्याप मिळालेली नाही त्याबाबतची खात्री करावी आणि अपीलकर्त्याला जी माहिती उपलब्ध झाली नसेल ती विनामुल्य उपलब्ध होण्यासाठी कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी नागपूर यांनी त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रथम अपीलाची सुनावणी घ्यावी व त्या सुनावणीत सर्व संबंधीतांना बोलावून अपीलकर्त्याला ज्या मुद्यांची माहिती मिळाली नाही ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1364-1366

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1639 नाग/2010

श्री लिलाधर रामकृष्ण ठाकरे
मु. कोलार पो. बुटीबोरी
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर
जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय
तेलंगखेडी रोड,शासकीय दुध योजना नागपूर
निवास परिसर, सिव्हील लाईन्स, नागपूर–1

2) श्रीमती रंजना बाराहाते
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर
जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय
तेलंगखेडी रोड,शासकीय दुध योजना नागपूर
निवास परिसर, सिव्हील लाईन्स, नागपूर–1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी असे नमुद केले की अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मच्छीमार सहकारी संस्था घोटी (ग्रामपंचायत कोलार) ता.जि.नागपूर या संस्थेच्या

बायलॉजची सत्यप्रत आणि नव्या व जुन्या सभासदांची यादी मागितलेली होती. तथापी अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर श्रीमती रंजना बाराहाते हया उपस्थित होत्या. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही सहकारी संस्थेच्या स्तरावरील असल्यामुळे त्यांनी दि. 10.6.2009 रोजी अध्यक्ष/व्यवस्थापक मच्छीमार सहकारी संस्था घोटी (ग्रामपंचायत कोलार) ता.जि.नागपूर यांना पत्र लिहून अपीलकर्ता यांचा दि. 8.6.2009 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पाठवून दिला आणि अपीलकर्त्यास बायलॉजची सत्यप्रत व सभासदाची जुनी व नवी यादी पुरविण्यात यावी असे निर्देश दिले व या पत्राची प्रत अपीलकर्त्यास देवून आपण संस्थेशी संपर्क साधून संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले होते. मात्र अपीलकर्त्याने त्यांना माहिती संस्थेकडून मिळाली किंवा नाही याबाबत पुन्हा जन माहिती अधिकारी यांचेकडे काहीही कळविलेले नाही मात्र त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारा दि. 22.9.2010 रोजी अर्ज सादर केला. त्या अर्लाला अनुसरुन देखील जन माहिती अधिकारी यांनी दि. 1.10.2010 रोजी सदर संस्थेच्या अध्यक्ष व व्यवस्थापकाना पत्र लिहून अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्याबाबत कळविले आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास देवून आपण संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे त्यात नमुद केले.

4. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की सहाय्यक निबंधकांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेस दि. 10.6.2009 व दि. 1.10.2010 च्या पत्राने कळविलेले आहेत. मात्र संस्थेने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. तथापी सदरची संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अंतर्गत नोंदणी झालेली असल्यामुळे या संस्थेवर वैधानिक नियंत्रण सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर यांचे आहे म्हणून त्यांनी सहकारी कायद्यातील तरतुदीला अनुसरुन संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध) नागपूर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील तरतुदी नुसार अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संबंधित संस्थेकडून त्यांच्या कार्यालयाकडे मागवून अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1368-1370

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 337/2010

श्री जैमेश तिलकराज थापर
38 क्लार्क टाऊन, थापर मार्ग,
जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री निशाणकर
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
नागपूर उडडान क्लब,
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 14.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.12.2010 रोजी नोटीस काढून दि. 27.1.2010 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून पुढील सुनावणी दिनांक 10.2.2011 रोजी ठेवण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते.

2. तक्रारदार यांच्या वतीने ॲड. श्री बरबटकर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्र. 839/2010 मधील निर्णय दि. 14.7.2010 रोजी देण्यात आला असून त्या निर्णयात असे नमुद केले आहे की अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 11.11.2009 च्या अर्जातील मुद्या क्र. 3 च्या संदर्भामध्ये रक्कम परत करण्याच्या संदर्भात ज्या अटी व शर्ती असतील त्यांच्या छायांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. मात्र त्या आदेशाप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर श्री निशाणकर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र. 839/2010 मधील दि. 14.7.2010 च्या निर्णयातील आदेशानुसार रक्कम परत करण्याच्या अटी किंवा टेंडर मधील अटीच्या संदर्भातील छायांकित प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. त्यानुसार दि. 13 ऑक्टोबर 2010 च्या पत्राने तक्रारदारास टेंडर फॉर्म व त्यामधील

असलेल्या अटी व शर्तीच्या छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची प्रत तक्रारदार यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र रक्कम परत करण्याबाबत नेमकी कोणती अट आहे त्याचा उलगडा व्हावा असे वकीलांनी सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की टेंडरच्या अटी व शर्ती यामध्ये दिलेल्या आहेत त्यामध्ये सर्व बाबींचा समावेश आहे त्याची प्रत तक्रारदारास उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की तक्रारदार यांना टेंडर मधील अटी व शर्ती याची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1367-1368

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1652 नाग/2010

श्री संजय धोंडबाजी टुले
रा. कारंजा वार्ड नं. 5
ता. कारंजा जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पारधी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर

2) श्री श्रीराम चव्हाण
जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहसचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.2.2011 )**

### नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 14.10.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहसचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर यांचकडे अर्ज सादर करुन त्यांनी मार्च 1993 मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमधील बैठक क्रमांक 105209 विद्यार्थी नामे श्री संजय धोंडबाजी टुले यांनी परीक्षा दिली होती तथापी त्या परीक्षेचा निकाल त्यांना मिळाला नाही म्हणून सदर विद्यार्थी डिबार्ड झाले अगर कसे याची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती

अधिकारी यांचेकडून दि. 20.10.2010 रोजी कळविण्यात आले आणि त्यामध्ये असे कळविले की श्री संजय धोंडबाजी टुले यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च 1993 च्या परीक्ष मध्ये गैरमार्गाचा अवलंब केल्यामुळे त्यांना डिबार्ड करण्यात आले होते. डिबार्डबाबतची माहिती असलेली यादी त्याच वर्षाच्या निकालासोबत कनिष्ठ महाविद्यालयास पाठविण्यात येते असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र त्यांना निकाल मिळाला नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील करण्याच्या ऐवजी पुन्हा दुसरा माहितीचा अर्ज दिला होता. तथापी त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहसचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर श्री चव्हाण आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर श्री पारधी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर असे नमुद केले की अपीलकर्ता यांचा दि. 14.10.2010 रोजीचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. 20.10.2010 रोजीच्या पत्रान्वये श्री संजय धोंडबाजी टुले यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च 1993 च्या परीक्ष मध्ये गैरप्रकार केल्यामुळे डिबार्ड केले होते. डिबार्ड विद्यार्थ्याची यादी त्या वर्षाच्या निकालासोबत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयास पाठविण्यात आली होती. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की राज्य मंडळ कार्यालय पुणे यांचेकडील पत्र दि. 19.7.2001 च्या पत्रानुसार गैरमार्ग अवलंबलेल्या विद्यार्थ्याची प्रकरणीका त्याला देण्यात आलेल्या शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर 6 महिन्यानी नेस्तनाबूत करण्याचे दिशानिर्देश असून त्यानंतरच विद्यार्थी श्री संजय धोंडबाजी टुले यांनी मार्च 1993 च्या परीक्ष मध्ये गैरप्रकाराबाबतची प्रकरणीका नेस्तनाबूत करण्यात आली असल्याने माहिती देता येणार नाही आणि त्याप्रमाणे अपीलकर्त्यास त्यांनी दि. 20. 10.2010 आणि दि. 1.11.2010 च्या पत्राने कळविल्याचे सुनावणीत नमुद केले.

4. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 20.10.2010 आणि दि. 1.11.2010 च्या पत्राने संपूर्ण वस्तुस्थिती कळविल्याचे दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1370-1372

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1653 नाग/2010

श्री पुरुषोत्तम भिसीकर
कोष्टीपूरा शाळे जवळ, भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पारधी
प्रथम अपीलीय अधिकारी विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर

2) श्री श्रीराम चव्हाण
जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहसचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.12.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. मार्डीकर हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की विभागीय सहा. सचिव नागपूर विभागी मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 4 मार्च 2010 ते 17 मार्च 2010 च्या दरम्यान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मार्च 2010 मधील भिवापूर एज्युकेशन सोसायटीज बॉईज हायस्कूल भिवापूर परीक्षा केंद्र क्र. 1510 च्या सर्व विषयाच्या प्रत्येक ब्लॉकवाईज फॉर्म नं. 1 व 2 च्या कार्यालयीन प्रतीची मागणी करण्यात आली होती. त्या

माहितीला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.9.2010 च्या पत्राप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती ही अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री चव्हाण आणि प्रथम अपीलीय अधिकारी श्री पारधी हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगा समोर असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या अर्जाच्या अनुषंगाने फॉर्म नं. 2 हे गोपनिय प्रेसला छपाई करीता पाठविण्यात आले असल्याने व त्यांचेकडून सदर फॉर्म प्राप्त होत नसल्याने फॉर्म नं. 2 देता येणार नाही तसेच फॉर्म नं. 1 च्या छायांकित प्रती विहित शुल्क भरुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकर्त्यास दि. 23.9.2010 च्या पत्राने कळविले होते. तथापी अपीलकर्त्याने फॉर्म नं. 1 च्या छायांकित प्रती विहित शुल्क भरुन अद्यापपर्यंत घेतलेल्या नाहीत म्हणून अपीलकर्त्याने फॉर्म नं. 1 बाबत शुल्क भरल्यानंतर अपीलकर्त्यास फॉर्म नं. 1 च्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दि. 27.10.2010 रोजी दाखल झाले होते. त्यांची सुनावणी दि. 11.11.2010 रोजी ठेंवण्यात आली होती. मात्र अपीलकर्ता सुनावणीज हजर राहीले नाहीत म्हणून सदरचे अपील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना फी भरण्याचे कळविल्यामुळे त्यांनी फी भरली नाही म्हणून प्रथम अपील निकाली काढले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

5. अपीलकर्ता यांचे वकील तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी फॉर्म नं. 2 हे गोपनिय प्रेसला छपाई करीता पाठविण्यात येत असल्याने त्याची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होणार नाही आणि फॉर्म नं. 1 ची माहिती फी भरुन अपीलकर्त्याने प्राप्त करुन घेणे योग्य होईल. त्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 23.9.2010 च्या पत्राद्वारे कळविलेले दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास फॉर्म नं. 2 हा उपलब्ध करुन देता येणार नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य दिसून येते. मात्र फॉर्म नं. 1 ची माहिती अपीलकर्त्यास त्यांनी फी भरल्यानंतर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे संपर्क साधून फॉर्म नं. 1 ची विहित फी भरणा करावी आणि माहितीची फी भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना फॉर्म नं. 1 ची माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1374-1376

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1651 नाग/2010**

श्री रामदास वेळेकर
प्लॉट क्र.1517, महर्षि दयानंद नगर,
कमाल टॉकिज रोड, वैशाली नगर बस स्टॉप जवळ,
नागपूर ता. जि. नागपूर –440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रकाश ग. भुक्ते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप संचालक
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, मुख्य कार्यालय,पुणे
मध्यवर्ती इमारत, पुणे 411 001
2) श्री अ. मा. मुळे
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, मुख्य कार्यालय,पुणे
मध्यवर्ती इमारत, पुणे 411 001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की त्यांनी दि. 17.5.2010च्या अर्जान्वये माहितीच्या अधिकारा खाली माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, मुख्य कार्यालय,पुणे यांचेकडे सन 2004 ते सन 2010 या कालावधीत विशेष मागास प्रवर्ग या संवर्गात सहा. संचालक नगर रचनाकार, व सहा. नगर रचनाकार या पदावर काम करणारे कर्मचारी तथा अधिकारी यांच्या बाबत माहिती मागितलेली होती. त्यांच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना दि. 24.6.2010 रोजी माहितीची फी रु. 37/– भरण्याबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांनी माहितीची फी रु. 37/– भरणा केली त्यानंतर त्यांना दि. 27.7.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली परंतू सदरच्या माहिती मध्ये श्री सु. रा. भागवत तसेच श्रीमती अ. रा. रंभाड यांच्या बद्यलची माहिती त्यांना अपूर्ण मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, मुख्य कार्यालय,पुणे श्री मुळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप संचालक नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, मुख्य कार्यालय,पुणे हे देखील उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन

त्यांनी मागितलेली माहिती अभिलेखातून काढण्यात आली आणि ती संकलीत करुन त्या माहितीची फी रु. 37/– भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 24.6.2010 च्या पत्राने कळविले. त्यानुसार अपीलकर्त्याने मनिऑर्डरने माहितीची फी रु. 37/– त्यांचेकडे पाठविली. माहितीची फी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपीलकर्त्यास दि. 27.7.2010 च्या पत्राने सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी याबाबत अपीलकर्त्याने आयोगा समोर असे सांगितले की त्यांना श्री सु. रा. भागवत तसेच श्रीमती अ. रा. रंभाड आणि श्री प्र. मो. नल्ला यांची माहिती अपूर्ण मिळालेली आहे. म्हणून आज रोजी सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीतील श्री प्र. मो. नल्ला यांच्या शैक्षणीक अर्हतेची माहिती तसेच श्री सु. रा. भागवत यांच्या पदोन्नती नियमित बाबतची माहिती तसेच श्रीमती अ. रा. रंभाड यांच्या तात्पुरत्या पदोन्नती बाबतची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्याने आयोगा समोर सदरची माहिती उपलब्ध झाल्याचे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1378-1339

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1644 नाग/2010**

श्री सुभाष गुलाबराव निंबेकर
मु. पो. आष्टी(शहीद)
ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती सुलोचना निगडे
प्रथम अपीलीय अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा

2) श्री एस. आर. गुप्ता
जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय (सामान्य शाखा) वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की दि. 5.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय (सामान्य शाखा) वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन स्वातंत्र संग्राम सैनिक नामनिर्देशीत 1 ते 208पर्यंत यादी आहे ते सर्व लोक सेवाजेष्ठते नूसार नोकरीत लागलेले आहेत किंवा कसे याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 17.9.2010 रोजी माहिती उपलब्ध

करुन दिली. रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती चुकीची आहे म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपीलानंतर त्यांना आवश्यक माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.5.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. मात्र अपीलकर्त्याचा दुसरा अर्ज दि. 28.7.2010 रोजी प्राप्त झाला. आणि त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 21.7.2010 रोजी माहितीची फी भरण्याबाबत कळविले. मात्र अपीलकर्त्याने माहितीची फी भरली नाही. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी दि. 14.9.2010 रोजी पुन्हा अर्ज सादर केला. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविल्याचे नमुद केले. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की स्वातंत्र संग्राम सैनिक नामनिर्देशीत 1 ते 208पर्यंतची यादी आहे त्या यादीतील सर्व लोक सेवाजेष्ठते नूसार नोकरीत लागलेले आहेत किंवा कसे याची माहिती त्यांना मिळालेली नाही. याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा समोर असे सांगितले की त्यांचे कार्यालयाकडे फक्त स्वातंत्र संग्राम सैनिक यांच्या पाल्यांची यादी आहे त्या यादीतील व्यक्तींना सेवाजेष्ठते नूसार नोकरी मिळाली अगर कसे याची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही कारण शासनाच्या अनेक विभागाकडे स्वातंत्र संग्राम सैनिक यांच्या पाल्यांची यादी पाठविली जाते आणि त्याची निवड शासनाचे कार्यालय त्यांच्या शैक्षणीक अर्हते नुसार करीता असतात. म्हणून त्यांच्या कार्यालयाकडे स्वातंत्र संग्राम सैनिक यांच्या पाल्यांची यादी आहे मात्र त्याबाबतची जेष्ठतासूची त्यांचेकडे नाही.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे स्वातंत्र संग्राम सैनिक यांच्या पाल्यांची यादी आहे त्याबाबतची जेष्ठतासूची त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना स्वातंत्र संग्राम सैनिक यांच्या पाल्यांची यादी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे मात्र त्यांची जेष्ठतासूची उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1381-1383

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1662 नाग/2010

श्री किशोर श्रावण घडले
मु. पो. बाजार टोला, डोंगरी बु.
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. पी. बडगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,(पंचायत)
पंचायत समिती तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा
2) श्री एस. एन. भोयर
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत डोंगरी बु.
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.2.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 26.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत डोंगरी बु. ता. तुमसर जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2005–2007 पासून सन सन 2010–2011पर्यंत 22.5 टक्के मधून एस. सी./एस.टी.ची कोणती कामे करण्यात आली इत्यादी बाबत 1 ते 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी,(पंचायत) पंचायत समिती तुमसर ता. तुमसर जि. भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलात त्यांना माहिती पुरविण्याचे आदेश असूनही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत डोंगरी बु. ता. तुमसर जि. भंडारा आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,(पंचायत) पंचायत समिती तुमसर हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 26.7.2010 रोजीचा अर्ज दि. 29.7.2010 रोजी प्राप्त झाला. अर्जातील माहिती नुसार अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे झेरॉक्स प्रती काढण्यास लागणारा खर्च चालान द्वारे भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 30.7.2010 रोजी यु.पी.सी.ने पत्र पाठवून कळविले. मात्र अपीलकर्ता रेकॉर्डच्या पाहणीसाठी आणि झेरॉक्स प्रतीची फी भरण्यासाठी कार्यालयात उपस्थित झाले नाही म्हणून पुन्हा दि. 25.8.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास बोलावून फी भरण्याबाबत कळविले असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र याबाबत अपीलकर्त्याला जन माहिती अधिकारी यांचे फी भरण्याचे दि. 30.7.2010 चे पत्र प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सांगितले. मात्र सदरचे पत्र यु.पी.सी.ने पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविला.

4. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,(पंचायत) पंचायत समिती तुमसर यांचेकडे प्रथम अपील दि. 23.9.2010 रोजी दाखल केले. त्याची सुनावणी दि. 16.10.2010 रोजी घेण्यात आली आणि निर्णय दि. 16.10.2010 रोजी देण्यात आला. त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की अपीलकर्ता यांचेकडून बी पी एल चा दाखला घेवून नियमानुसार माहिती अपीलकर्त्यास देण्यात यावी कारण अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते बी पी एल धारक आहेत. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 25.10.2010 रोजी पत्र देवून कळविले की आपण मागितलेली माहिती शोधण्यास वेळ लागेल तरी सदर माहिती आपणास दि. 29.10.2010 रोजी देण्यात येईल त्यानुसार बी पी एल चे प्रमाणपत्र घेवून दि. 29.10.2010 ला कार्यालयात उपस्थित राहावे. म्हणून दि. 29.10.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. परंतू अपीलकर्ता दि. 29.10.2010 रोजी बी पी एल चे प्रमाणपत्र घेवून माहिती घेण्यास त्यांच्या कार्यालयाकडे आले नाहीत म्हणून पुन्हा अपीलकर्त्यास दि. 30.10.2010 पत्र पाठविले. त्यानंतरही अपीलकर्ता माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यांचेकडे गेले नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यावर अपीलकर्ता यांनी आयोगा समोर असे सांगितले की त्यांनी आयोगा समोर दुसरे अपील दाखल केल्यामुळे ते माहिती घेण्यास गेले नाहीत.

5. तथापी आज आयोगा समोर अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना बी पी एल चे प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती आयोगा समोर उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्याने सदरची माहिती आयोगा समोर स्वीकृत करुन पोच दिली त्यामुळे अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1386-1388

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1661 नाग/2010

श्री वासुदेव यादव खोब्रागडे
मु. पो. मेंढा(किरमीटी)
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संतोष गव्हाणकर
प्रथम अपीलीय अधिकारी
विभागीय सुलभकर्ता (जल स्वराज्य प्रकल्प) कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री राजेश कानडे
जन माहिती अधिकारी तथा जिल्हा साधन गट प्रमुख
जल स्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की त्यांनी दि. 25.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा साधन गट प्रमुख जल स्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मेंढा(किरमीटी) ग्रामपंचायतला जल स्वराज्य प्रकल्प योजनेमधून घेण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजने करीता सन 2005–2006 पासून 27.9. 2010पर्यंत प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत व विहीरीचे बांधकामा विषयी एकुण 7 मुद्यांवर

माहिती मागितलेली होती. परंतू त्यांना 30 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल करुनही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा जिल्हा साधन गट प्रमुख जल स्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद चंद्रपूर श्री राजेश कानडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री संतोष गव्हाणकर हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 25.8.2010 चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पोस्टाद्वारे दि. 30.8.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि त्या माहितीची फी रु. 90/- भरण्याकरीता अपीलकर्त्यास दि. 22.9.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने पाठविले असून ते अपीलकर्त्यास मिळाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी दाखविली. याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना 30 दिवसात माहिती मिळाली नाही म्हणून त्यांना विनामुल्य विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले आहे की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 25.8.2010 चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 30.8.2010 रोजी पोस्टाद्वारे प्राप्त झाल्यामुळे 30 दिवसाचे आत म्हणजे दि. 29.9.2010 रोजी माहितीची फी रु. 90/- भरण्या बाबत कळविले होते. मात्र अपीलकर्त्याने माहितीच्या फी चा भरणा केला नाही.

4. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दि. 29.9.2010 रोजी प्राप्त झाले. परंतू अर्जाला अनुसरुन दि. 30. 8.2010 रोजी अपीलकर्त्यास माहितीची फी रु. 90/- भरणा करुन माहिती घेवून जाण्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. मात्र अपीलकर्त्याने माहितीच्या फी चा भरणा केला नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकत्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीची फी रु. 90/- चा भरणा

करण्याबाबत दि. 22.9.2010 च्या पत्राने म्हणजे 30 दिवसाचे आतच कळविले होते. तथापी अपीलकर्त्याने आवश्यक त्या फी चा भरणा केला नाही म्हणून अपीलकर्त्याने आवश्यक त्या फी चा भरणा करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे आवश्यक त्या फी चा भरणा करावा आणि अपीलकर्त्याने आवश्यक त्या फी चा भरणा केल्या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1388-1390

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1645 नाग/2010

श्री भूषण केशवराव तिजारे
मेदी, नागसेन नगर, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष
शिक्षण प्रसारक मंडल कामठी
द्वारा सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा सचिव
शिक्षण प्रसारक मंडल कामठी
द्वारा सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 15.2.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 14.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी शिक्षण प्रसारक मंडल कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन शैक्षणीक संस्थेस भाषिक अल्पसंख्यांक दर्जा मिळाल्या संबंधी 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडून दि. 13.10.2010 च्या पत्रान्वये मुद्या क्र. 2 आणि 3 ची माहिती मिळाली मात्र मुद्या क्र. 1 आणि 4 ची माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून अपूर्ण माहिती उपलब्ध झाली म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. 21.10.2010 रोजी दाखल

केले. विहित मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील मुदतीत काढले नाही त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे ॲड. एस. एन. भट्टड हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या आत म्हणजे दि. 13.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी मुद्या क्र. 1 बाबत भाषिक अल्पसंख्यांक दर्जा मिळाण्यासाठी संस्थेने शासनाकडून जो प्रस्ताव पाठविलेला होता तो संपूर्ण प्रस्ताव मुळ स्वरुपात शासनाकडून संस्थेकडे सादर केला आहे. त्याची कार्यालयीन प्रत शाळेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र भाषिक अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांच्या वकीलांनी सुनावणीत नमुद केले. तसेच मुद्या क्र. 4 बाबतची माहिती सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय कामठी यांचेकडून प्राप्त करावी असेही अपीलकर्त्यास कळविल्याचे वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वकीलांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्र. 2 व 3 ची माहिती उपलब्ध झालेली आहे. मात्र मुद्या क्र. 1 भाषिक अल्पसंख्यांक दर्जा मिळाण्याकरीता संस्थेने शासनाकडे मुळ प्रस्ताव सादर केला असल्यामुळे आता त्याची कार्यालयीन प्रत संस्थेकडे उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी लेखी दिलेले आहे. तथापी मुद्या क्र. 4 बाबत भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाल्या नंतर महाविद्यालयातर्फे करण्यात आलेल्या कर्मचा–याच्या नियुक्तीसाठी दिलेल्या जाहिरातीची प्रत शिक्षण उपसंचालक यांचेकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाची प्रत व अप्रुव्हलची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरविणे संयुक्तीक होईल. कारण सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय कामठी हे महाविद्यालय शिक्षण प्रसारक मंडल कामठी यांच्या अंतर्गत आहे म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य मुद्या क्र. 4 ची माहिती व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय 30 दिवसाच्या मुदतीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेतलेला दिसून येत नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घ्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1392-1394

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1660 नाग/2010

सौ. योगिता संजय जांभुळकर उर्फ योगिता भिवराम कोचे
रा. महात्मा फुले वार्ड, तिरोडा
पो. ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया

2) श्री एम. एन. गोहणे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक(न.पा.प्र.शाखा)
जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.2.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी दि. 28.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक(न.पा.प्र. शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नगर परिषद तिरोडा सन 2007 च्या निवडणूका करीता जात पडताळणी होण्यासाठी आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. 492/2006 दि. 6.12.2006 नुसार तिरोडा तहसिल कार्यालयाकडून प्रस्ताव पाठविलेला आहे. आतापर्यंत सदर जात पडताळणी का झाली नाही किंवा आपल्या कार्यालयातून जात पडताळणी विभागाकडे प्रस्ताव पाठविला

असेल तर त्याचे जावक क्रमांक द्यावा म्हणून या प्रकरणा विषयी आपल्या कार्यालयाकडून काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 227.2010 च्या पत्राने त्यांना माहिती दिली आहे मात्र जात पडताळणी का झाली नाही याची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे दि. 4.8.2010 रोजी दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि सुनावणी घेवून निर्णय दि. 2.9.2010 रोजी देण्यात येवून त्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दि. 227. 2010 च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली म्हणून अपील निकाली काढले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक(न.पा.प्र. शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया श्री एम. एन. गोहणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री राव हे देखील उपस्थित होते. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा समोर असे सांगितले की अपीलकर्तीने मागितलेली माहिती दि. 227.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. कारण अपीलकर्तीचे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव त्यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे पाठविलेला असून जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही समाज कल्याण विभागाकडून होत असते त्याचा संबंध जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाशी येत नाही म्हणून अपीलकर्तीचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे सादर केलेल्या पत्राची प्रत अपीलकर्तीस दि. 227.2010 च्या पत्राद्वारे दिलेली आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्तीस दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्तीस मिळाल्याचे अपीलकर्तीने सुनावणीत मान्य केले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ती यांचा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे सादर केलेला असून त्या पत्राची प्रत अपीलकर्तीस उपलब्ध करुन दिलेली आहे. जात पडताळणी वैधता प्रमाणपत्राची कार्यवाही समाज कल्याण विभागाशी संबंधीत आहे त्याचा संबंध जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाशी येत नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1396-1398

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 313/2010

सौ. वेणू तुळशीराम सोरते
138 आदिवासी सोसायटी, वृंदावन कॉलनी,
काटोल रोड नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
पंचायत समिती नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 29.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्रमांक 1417/2010 मधील दि. 23.11.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्यांना मुदतीत वेतन आयोगाच्या थकबाकीची बीले मंजुर झालेली नाहीत असे तक्रारदार यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नागपूर श्रीमती इंगोले हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती नागपूर श्री धाबेराव हे देखील उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्रमांक 1417/2010 मधील दि. 23.11.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे अपीलकर्तीस दि. 23.11.2010 च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरचे पत्र तक्रारदार यांना यु.पी.सी.ने पाठविलेले असून त्या यु.पी.सी.ची झेरॉक्स प्रत सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दाखविली. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि. 23.11.2010 चे पत्र तक्रारदार यांना मिळाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्यांना पूर्ण थकबाकीचे हप्ते मिळालेले नाहीत असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी याबाबत मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचेकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर हप्त्याची रक्कम अदा करण्यात येईल असे तक्रारदारास प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी यांनी दि. 23.11.2010 च्या पत्राने कळविलेले असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1407-1408

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 297/2010**

श्री राजेंद्र भाऊरावजी नाखले
रा. मु. पो. वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री जे. बी. डवरे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.2.2011 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 5.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय वाकी हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 8.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय वाकी यांच्या कार्यालयाकडे ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामसभेत झालेल्या ठरावाच्या सत्यप्रती आणि नवीन घर टॅक्स लावलेल्या टॅक्स पावत्याची माहिती दि. 1.1.2008 ते आजतागायत आणि दि. 1.1.2009 ते आजतागायत अशी माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 27.2.2010 च्या पत्राने माहितीची फी रु. 672/- भरण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे त्यांनी दि. 10.3.2010 रोजी रु. 672/- माहितीच्या फी चे भरले. परंतू त्यांना अद्याप माहिती मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय वाकी ता. सावनेर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झला होता. त्यांनी मागितलेली माहिती संकलीत करण्यात आली आणि त्या माहितीची फी रु. 672/- भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 27.2.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानुसार तक्रारदार यांनी रु. 672/- चा भरणा दि. 10.3.2010 रोजी केला आणि त्याच दिवशी

तक्रारदार यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र नजरचुकीने माहिती उपलब्ध करुन दिल्या नंतर माहितीची पोच घेण्याबाबत ते विसले म्हणून ते सुनावणीत पोच दाखवू शकले नाहीत. तथापी यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कोणतीच माहिती मिळाली नाही.

4. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. 10.3.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सुनावणीत सांगितले. मात्र त्याची पोच ते सुनावणीत दाखवू शकले नाहीत. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी आता पुन्हा तक्रारदार यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य हा आदेश मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी व माहिती उपलब्ध करुन दिल्या नंतर त्यांची पोच घ्यावी. म्हणून तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य हा आदेश मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1410-1411

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 296/2010**

श्री देवेंद्र विजयकुमार गहेरवार
रा. किल्ला वार्ड, गुरुदेव चौक
तिरोडा जि. गोंदिया ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री जे. बी. नायगावकर
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
आर.एस.जी.के. अग्रवाल हायस्कुल, तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 14.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.2.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की त्यांचे आयोगाकडील अपील क्रमांक 1310/2010 मधील दि. 23.9.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून पूर्ण माहिती मिळाली नाही. तथापी त्यांना दि. 4.10.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती दि. 2.11.2010 रोजी मिळाली. त्यामध्ये मुद्या क्र. 2 आणि 3 ची माहिती मिळाली. तथापी मुद्या क्र. 4 आणि 5 ची माहिती त्यांना अपूर्ण मिळाली. त्यांना बिंदू नामावली प्रमाणे मागास वर्गाच्या रोस्टरची संपूर्ण प्रत त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यामुळे त्यांना मुदतीत वेतन आयोगाच्या थकबाकीची बीले मंजुर झालेली नाहीत असे तक्रारदार यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका आर.एस.जी.के. अग्रवाल हायस्कुल, तुमसर ता. तुमसर जि. भंडारा हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की मा. आयोगाकडील अपील क्रमांक 1310/2010 मधील दि. 23.9. 2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना त्यांच्या दि. 7.5.2010 च्या अर्जातील मुद्या क्र. 2, 3, 4 व 5 याबाबतची शाळेकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती रजिस्टर पोस्टाने दि. 4.10.2010 च्या पत्राने पाठविलेली आहे. सदरची माहिती तक्रारदार यांना मिळाल्याचे सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्याचे तक्रारदार

2

यांनी सुनावणीत सांगितले. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की तक्रारदाराने त्यांच्या कडील दि. 17.5.2010 च्या अर्जातील मुद्या क्र. 2, 3, 4 व 5 याबाबतची माहिती मागितली आहे. त्या अर्जाप्रमाणेच तक्रारदार यांना माहिती विनामुल्य पाठविलेली आहे. तथापी तक्रारदार यांना त्यांनी मागीतलेल्या माहिती व्यतीरीक्त इतर माहिती मागत आहेत असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. तसेच मागास वर्गीय कर्मचा–यांच्या बिंदूनामावली आणि रोस्टर बाबत शाळेकडे उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले.

4. यावरुन असे दिसून येते की तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य दिलेली दिसून येते. या माहिती व्यतीरीक्त शाळेकडे इतर कोणतीही माहिती उपलब्ध नाही असे तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविणे योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. 4.10.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या माहिती व्यतीरीक्त कोणतीही माहिती शाळेकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1413-1414

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**

खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 285/2010**

श्री पी. एम. पद्मावार
बी 2/202, शिवराया सोसायटी, समृध्दी संकूल
सिव्हील लाईन अमरावती रोड
नागपूर – 1 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक – 1, नागपूर
सदर, नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 20.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार गैरहजर आहेत. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक – 1 श्री के. व्ही. माडेलवार हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणत्याही प्रकारचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी जन माहिती अधिकारी हे सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की आयोगाकडील अपील क्रमांक 679/2010 मधील दि. 2.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना श्री ब्राम्हणकर, श्री एम. आरमुगम, श्री पी. सी. काळभोर यांच्या शासकीय निवासस्थान वाटपाच्या नस्तीचे निरीक्षण करुन देण्यासाठी तक्रारदार यांना त्यांच्या कडील दि. 23.8. 2010 च्या पत्राप्रमाणे कळविल्यानुसार ते कार्यालयात उपस्थित झाले आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या सर्व नस्त्या निरीक्षणासाठी देण्यात आल्या. त्या सर्व नस्त्याचे निरीक्षण त्यांनी करुन घेतले तथापी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्या नस्त्यामध्ये उपलब्ध होवू शकले नाही. त्याचप्रमाणे तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीत देखील असे नमुद केले की त्यांनी नस्त्याचे निरीक्षण केले परंतू त्यांना पाहिजे असलेली माहिती त्या नस्त्यामध्ये उपलब्ध झालेली नाही.

2

3. तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेल्या तक्रारीतील मुख्य बाब असे दिसून येते की तक्रारदार यांना Govt. Accommodation Rules ची प्रत पाहिजे आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सद्यस्थितीत त्यांच्या कार्यालयाकडे स्वतंत्रपणे Govt. Accommodation Rules ची कोणतीही प्रत उपलब्ध नाही. तथापी प्रचलीत शासकीय निवासस्थान वाटपा बाबत Maharashtra Public Works Department Manual आणि मुंबई नागरी सेवा नियम पुस्तीका या मध्ये शासकीय निवासस्थाने वाटपा बाबतची कार्यप्रणाली नमुद केलेली आहे. म्हणून तक्रारदार यांना ही कार्यप्रणाली उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की तक्रारदार यांनी तक्रार अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचेकडून माहितीची फी रु. 500/- भरणा करुन घेतलेला नाही. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना Maharashtra Public Works Department Manual आणि मुंबई नागरी सेवा नियम पुस्तीका या मधील शासकीय निवासस्थाने वाटपा करण्या बाबतच्या कार्यप्रणालीच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1416-1417

जा.क्र.---------- दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 362/2010**

सौ. छाया अनंतरावजी राहाटे
मुंशी वाडा, झेंडा चौक
महाल नागपूर 440002 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री आर. एस. सायरे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 22.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 3.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 1207/2009 मधील दि. 27.1.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे 10 दिवसाचे आत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तक्रारदार यांची प्रामुख्याने अशी तक्रार आहे की त्यांनी त्यांच्या शेतावरील मालकी हक्क सोडल्याचा (विनामोबदला हक्क सोडल्याचा) दाखल्याची प्रमाणीत प्रत त्यांना पाहिजे होती. तथापी त्यांना ती प्रत मिळाली नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार कामठी श्री आर. एस. सायरे हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात तत्कालीन नायब तहसिलदार यांचेकडे सदरच्या कागदपत्राच्या संदर्भात चौकशी केली मात्र सदरचे कागदपत्र त्यांना मिळाले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही आणि त्याबाबत संबंधीत तलाठी यांनी यापूर्वीच तक्रारदारास दि. 30.8.2008 च्या पत्राने मालकी हक्क सोडल्याचा दाखला उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. यावर तक्रारदार यांनी असे सांगितले की तलाठी यांचे कडील दि. 30.8.2008 च्या पत्र त्यांना मिळाले. मात्र त्यावर कार्यालयाचा शिक्का व तारीख देखील नाही. तलाठी यांची सही मात्र आहे. म्हणून जन माहिती अधिकारी आणि तक्रारदार यांच्या संमतीने असे ठरले की तलाठी यांनी दि. 30.8.2008 च्या पत्राने

तक्रारदारास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या पत्राची प्रमाणीत प्रत जन माहिती अधिकारी यांनी द्यावी. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.



**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार हे अंशतः मंजुर करण्यात येत असून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तलाठी यांचे कडील दि. 30.8.2008 चे पत्राची प्रत साक्षांकीत करुन द्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1419-1420

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 359/2010**

श्री प्रशांत शामकांत बागडदेव
भुखंड क्रमांक 53, दि पोस्टल ऑडीट कॉलनी
राणाप्रताप नगर नागपूर – 22 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री एस. एस. कुदरे
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन,
पोलीस आयुक्तालय, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 22.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 13.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार उशिरा हजर झाले. गैरतक्रारदार सुनावणीस हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी आयोगा समोर असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 407/2009 मधील दि. 18.8.2009 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना त्यांच्या दि. 29.1.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही. तथापी त्यांना दि. 14.9.2009 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त नागपूर शहर यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ती माहिती त्यांच्या दि. 29.1.2009 च्या अर्जाप्रमाणे दिलेली नाही असे त्यांनी नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन, पोलीस आयुक्तालय, नागपूर श्री एस. एस. कुदरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त मुख्यालय श्री गुर्जर हे देखील उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की मा. आयोगाकडील अपील क्रमांक 407/2009 मधील दि. 18.8.2009 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांच्या दि. 29.1.2009 च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती तक्रारदार यांना दि. 14.9.2009 च्या पत्राने रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविलेली असून त्या माहितीची पोच त्यांना प्राप्त झालेली आहे. तथापी यावर तक्रारदारयांचे म्हणणे असे आहे की सदरची माहिती त्यांना प्राप्त झाली मात्र ती माहिती न्यायप्रविष्ट प्रकरणातील असून त्यांच्या दि. 29.1.2009 च्या अर्जातील मागितलेली

माहिती नाही. म्हणून तक्रारदार यांना दि. 29.1.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही असे तक्रारदार यांनी सांगितले.

4. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी दि. 14.9.2009 च्या पत्राने तक्रारदारास उपलब्ध करुन दिलेली माहिती ही तक्रारदार यांच्या दि. 29.1.2009 च्या अर्जाच्या माहितीच्या अनुषंगाने दिलेली नाही असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांच्याकडील दि. 29.1.2009 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य देणे संयुक्तिक होईल. किंवा जन माहिती अधिकारी यांनी दि. 14.9.2009 च्या पत्राने दिलेली माहिती ही तक्रारदाराच्या दि. 29.1.2009 च्या अर्जाप्रमाणे असेल तर त्याप्रमाणे स्पष्टपणे वस्तूस्थिती तक्रारदार यांना कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांच्याकडील दि. 29.1.2009 च्या अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. किंवा दि. 14.9.2009 च्या पत्राप्रमाणे तक्रारदार यांना पुरविलेली माहिती त्यांच्याकडील दि. 29.1.2009 च्या अर्जाप्रमाणेच पुरविली असल्यास तसे स्पष्टपणे वस्तुस्थिती तक्रारदार यांना कळवावी.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1431-1432

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 361/2010

श्री रमण बिसन देशमुख
मु.हसारा रोड शगुन कान्व्हेंट जवळ
श्रीराम नगर पो. ता. तुमसर
जि. भंडारा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री एस. जी. धरसेले
जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद गोंदिया ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 22.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 3.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 1139/2010 मधील दि. 30.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना सन 1993 ते सप्टेंबर 1998पर्यंतच्या सावीत्रीबाई फुले ज्ञानपीठ प्राथमिक शाळा गोंडे/नवेगाव बांध ता. अर्जुनी मो. जि. गोंदिया या शाळेत प्रभारी मुख्याध्यापक म्हणून केलेल्या सेवाकाळाची वैयक्तीक मान्यता पत्र जन माहिती अधिकारी यांचेकडून मिळाले नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद गोंदिया श्री एस. जी. धरसेले हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांनी मागितलेली वैयक्तीक मान्यतेची पत्र त्यांचे कार्यालयाकडे शोध घेवूनही उपलब्ध झाली नाही. त्याचे कारण असे की पूर्वी त्यांचे कार्यालय भंडारा येथे कार्यरत होते. सदरच्या कार्यालयाची स्थापना 1 मे 1999 रोजी गोंदिया येथे झाले. त्यामध्ये तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीचा शोध घेतला परंतू ती माहिती सुमारे 17 वर्षापूर्वीची असल्यामुळे उपलब्ध होवू शकली नाही. तथापी तक्रारदाराच्या वैयक्तीक मान्यतेच्या प्रस्तावाची पत्र संबंधीत शाळेकडे असल्यास ती जन

माहिती अधिकारी यांनी शाळेकडून मागवून घेवून तक्रारदारास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापी शाळेकडून ती माहिती उपलब्ध न झाल्यास स्पष्टपणे तक्रारदारास तसे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्याचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत शाळेकडून तक्रारदाराने मागितलेल्या वैयक्तीक मान्यतेच्या प्रस्तावाची पत्र मागवावी व संबंधीत शाळेकडून माहिती उपलब्ध झाल्या नंतर तक्रारदार यांना पुरवावी. तथापी शाळेकडून माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे तक्रारदारास कळवावे.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1434-1435

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 321/2010**

श्री देवेंद्र मनोहर पाटील
रा. केळीबाग रोड, महाल
नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री एम. डी. पवार
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
कोतवाली पोलीस स्टेशन
महाल नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 22.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 18.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीत तक्रारदार यांनी असे सांगितले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली दि. 27.4.2010 रोजी अर्ज सादर करुन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त कोतवाली पोलीस स्टेशन महाल नागपूर यांचेकडे अपराध क्रमांक एम ओ 0809/10 दि. 1.5.2009 मध्ये मा. दंडाधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे कलम 302 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. परंतू आतापर्यंत आरोपपत्र दाखल झाले नाही त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे दाखल केलेले होते. तथापी ते विहित नमुन्यात नव्हते म्हणून त्याची दखल घेण्यात आली नाही त्याकरीता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे त्यांनी नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त कोतवाली पोलीस स्टेशन नागपूर श्री एम. डी. पवार हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांच्या दि. 27.4.2010 च्या माहिती अधिकारा खाली अर्जाला अनुसरुन तक्रारदारास दि. 24.5.2010 च्या पत्राने पोलीस स्टेशन कोतवाली येथे दाखल एम केस क्र. 0809/10 कलम 302 भा.दं.वि. चा गुन्हा तपासावर आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु असून तपास पूर्ण झाल्या नंतर कायदेशीर कार्यवाही करण्यात

येईल अशी माहिती तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यानंतर तक्रारदार यांनी प्रथम अपील पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे दाखल न करता सरळ तक्रार आयोगाकडे दाखल केल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमुद केले.

4. तसेच प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आणखी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की आता मात्र सदर गुन्हयाची संपूर्ण चौकशी करुन प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी नागपूर शहर यांचेकडे दि. 29.1.2011 रोजी सदर गुन्हयाचे 'ब' फायनल पाठविण्यात आले. म्हणून आता 'ब' फायनल मध्ये जी बयाने आहेत त्याची माहिती तक्रारदारास आता उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपराध क्रमांक एम ओ 0809/10 मधील 'ब' फायनल आणि त्या सोबतचे बयाण व इतर कागदपत्रे तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1437-1438

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 360/2010

श्री नारायण दाजीबा धकाते
रा. खात रोड, कोचे गॅस गोडावून जवळ
सरपंच वळे यांचे घरा जवळ
ता. जि. भंडारा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री जी. डी. मांडबगडे
जन माहिती अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय
नागपूर परिक्षेत्र नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 22.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 9.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की ते पोलीस अधिक्षक भंडारा यांच्या आस्थापनेवर प्रमुख लिपीक म्हणून कार्यरत होते. भंडारा जिल्हयाचे विभाजन झाल्याने गोंदिया हा नवीन जिल्हा अस्तीत्वात आला. त्यांची पदस्थापना भंडारा येथे कायम ठेवण्यात आली आणि पोलीस अधिक्षक भंडारा येथेच त्यांचे वेतन व भत्ते प्रदान करण्यात येत होते. पोलीस अधिक्षक भंडारा यांचे दि. 28.4.1999 च्या आदेशान्वये त्यांना गोंदिया येथे तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीवर ठेवण्यात आले होते. प्रतिनियुक्तीवर असतांना प्रवास भत्ता व इतर भत्ते देय होणार नाही असा कुठल्याही प्रकारचा आदेशात उल्लेख नव्हता. त्याप्रमाणे त्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता पोलीस अधिक्षक भंडारा यांनी मंजुर केला होता. मात्र महालेखाकार नागपूर यांच्या टेस्ट ऑडीट मध्ये सदर बीलाची वसुली करण्याचे आदेश दिले त्यामुळे ते सुवानिवृत्त झाल्या नंतर त्यांच्या रजा रोखीकरणाच्या रकमेतून रु. 28800/– कपात केलेली आहे. सदरची कपात टेस्ट ऑडीट मध्ये करण्या बाबत निर्देश दिलेले असल्यास त्या अहवालाची झेरॉक्स प्रत त्यांनी मागितलेली होती. मात्र आतापर्यंत त्यांना महालेखाकार यांच्या टेस्ट ऑडीट रीपोर्टची प्रत मिळालेली नाही असे तक्रारदार यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नागपूर श्री जी. डी. मांडबगडे हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती हे पोलीस अधिक्षक भंडारा या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे सदरची माहिती प्राप्त करुन घेण्या करीता पोलीस अधिक्षक भंडारा यांना दि. 29.6.2010 च्या पत्राने कळविले होते. पोलीस अधिक्षक भंडारा यांनी दि. 7.7.2010 च्या पत्रान्वये महालेखाकार यांनी घेतलेल्या लेखा निरीक्षण टिपणीतील लेखा आक्षेप व मुद्या क्र. 1 ते 3 प्रमाणे अहवाल कार्यालयीन टिपणीसह त्यांच्या कार्यालयाकडे सादर केला होता. सदरची प्राप्त झालेली माहिती देण्या साठी दि. 16.7.2010 ला तक्रारदार यांना कळविण्यात आले होते. तक्रारदार हे माहिती घेण्या करीता दि. 28.6.2010 रोजी त्यांच्या कार्यालयात समक्ष हजर झाले होते. परंतू तक्रारदार यांनी माहितीच्या पत्रासोबत महालेखाकार नागपूर यांच्या अहवालाची प्रत नाही म्हणून माहिती घेण्यास नकार दिला असे लिहून दिले. त्यानंतर तक्रारदार यांनी प्रथम अपील दाखल केले नाही मात्र राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की महालेखाकार नागपूर यांनी निरीक्षणाच्या कालावधीत घेतलेल्या आक्षेपा बाबत पोलीस अधिक्षक भंडारा हे महालेखाकार नागपूर यांचेशी वारंवार पत्रव्यवहार करीत आहेत मात्र महालेखाकार नागपूर यांचेकडून त्याबाबत अहवाल प्राप्त झाला नाही. अर्जदार यांना महालेखाकार नागपूर यांचेकडील अहवालाची प्राप्त पाहिजे आहे. यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की महालेखाकार नागपूर यांनी त्यांच्या आक्षेपा बाबत पूर्तता करण्याबाबत कळविलेले होते. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना पाहिजे आहे. मात्र प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की तक्रारदार यांचे कपात केलेल्या बीलाची रक्कम महालेखाकार नागपूर यांच्या टेस्ट ऑडीटमधील रीपोर्टच्या आधारे केलेली आहे. त्यामुळे तक्रारदार यांना महालेखाकार नागपूर यांच्या टेस्ट ऑडीट रीपोटची वसुली बाबतची प्रत उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्याच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी महालेखाकार नागपूर यांचेकडील टेस्ट ऑडीटमधील रक्कम वसुल करण्याबाबतच्या निर्देशाची प्रत तक्रारदार यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1439-1441

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 371/2010

श्री नथ्थू अमृतराव मडावी
मु. पो. नवतळा
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री डी. डब्लू आखाडे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 18.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 435/2009 मधील दि. 26.8.2009 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चिमूर श्री डी. डब्लू आखाडे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्रमांक 435/2009 मधील दि. 26.8.2009 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांच्या प्रकरणाची तहसिल कार्यालयात कसून शोध घेण्यात आला. त्याचप्रमाणे दि. 16.11.2009 च्या पत्राने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या कार्यालयाकडे प्रतिनिधी पाठवून जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या कार्यालयातील अभिलेखागार कक्षात तक्रारदार यांच्या प्रकरणाचा शोध घेण्यात आला. मात्र जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या कार्यालयात देखील कागदपत्रे मिळाली नाहीत म्हणून मा. माहिती आयोगाचे दि. 26.8.2009 च्या आदेशानुसार संबंधीत प्रकरणाचा या कार्यालयात शोध घेतला असता दि. 5.1.2010 ला तहसिल कार्यालयात लागलेल्या आगीत संपूर्ण रेकॉर्ड जळालेला आहे. त्यामुळे सन 2002 च्या पूर्वीचे कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांना पाहिजे असलेली कागदपत्र उपलब्ध करुन देता आली

नाहीत. त्याप्रमाणे तक्रारदार यांना दि. 13.5.2009 आणि 1.12.2009 प्रमाणे सविस्तर उत्तर दिलेले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

4. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीचे कागदपत्र तहसिल कार्यालयात दि. 5.1.2010 ला लागलेल्या आगीत संपूर्ण रेकॉर्ड जळाल्यामुळे कागदपत्र उपलब्ध होवू शकलेले नाहीत व त्याप्रमाणे तक्रारदारास जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.5.2009 आणि 1.12.2009 रोजी कळविलेले आहे. म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1443-1444

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 370/2010

श्री तोताराम हरीषकुमार नायडू
23, सप्तश्रुंगी विहार, शिव मंदीर मागे,
एच.बी.इस्टेट, सोनेगाव, नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री भूते
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक
नगर नियोजन विभाग, पहिला मजला
नारंग टॉवर, पाम रोड,
सिव्हील लाईन, नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 26.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 772/2008 मधील दि. 25.5.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झालेली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपभियंता नगर रचना महानगर पालिका नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगा समोर असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्रमांक 772/2008 मधील दि. 25.5.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे अर्जदार श्री पी.एस.नायडू यांना श्री सप्तश्रुंगी डेव्हलपर्स मौजा सोनेगाव येथील मंजूर अभिन्यासाच्या दोन्ही नस्त्यांची दि. 22.7.2009 रोजी पाहणी केली व त्या दोन्ही नस्त्यातील अर्जदाराने मागितलेली कागदपत्रे अर्जदारास उपलब्ध करुन दिलेली आहेत. ती कागदपत्रे मिळाल्या बाबत तक्रारदार यांची सही घेण्यात आलेली आहे. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविली. सदरची माहिती मिळाल्याबाबतची पोच तक्रारदार यांची असल्याचे त्यांनी मान्य केले.

4. तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की आयोगाकडील अपील क्रमांक 772/2008 मधील दि. 25.5.2010 च्या निर्णयात असे नमूद केले होते की जन माहिती अधिकारी यांचेकडे असलेल्या नस्तीचे अपीलकर्ता यांनी निरीक्षण करावे व निरीक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी. आयोगाच्या या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांनी दि. 22.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात नस्तीचे निरीक्षण करुन त्यांना पाहिजे असलेली माहिती देण्यात आल्याचे दिसून येते. त्याबाबत तक्रारदार यांची पोच देखील घेतलेली आहे. म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1446-1447

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 369/2010**

श्री तोताराम हरीषकुमार नायडू
23, सप्तश्रृंगी विहार, शिव मंदीर मागे,
एच.बी.इस्टेट, सोनेगाव, नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री प्र. प्र. धनकर
जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता,
पश्चिम तथा सहाय्यक माहिती अधिकारी
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 24.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 10.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की आयोगाकडील तक्रार क्रमांक 194/2010 मधील दि. 26.10.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना टपाल खर्चाची रककम रु. 110/– परत मिळाली परंतू सदरची रक्कम 10 दिवसा नंतर परत मिळाली म्हणून सदरची रक्कम विलंबाने परत मिळाल्याचे त्यांनी नमुद केले. तसेच मुद्या क्र. 8 ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अद्याप पूर्णपणे उपलब्ध झालेली नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर श्री प्र. प्र. धनकर तसेच विभागीय अधिकारी पश्चिम नागपूर सुधार प्रन्यास नागपूर श्री गांगुली हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की आयोगाकडील तक्रार क्रमांक 194/2010 मधील दि. 26.10.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना मुद्या क्र. 8 अग्नीरथ संकूल या बांधकामाचे पर्यवेक्षण कोणत्या अधिका–याद्वारे करण्यात आले याबाबतची माहिती दि. 16.12.2010 च्या पत्राने विनामुल्य पुरविण्यात आली. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचा मुद्या क्र. 8 अग्नीरथ संकूल या बांधकामाचे पर्यवेक्षण कोणत्या अधिका–याद्वारे करण्यात आले याबाबतची त्यांना माहिती पाहिजे आहे ती माहिती त्यांना उपलब्ध नाही केवळ त्यांना Appendix F H J & K हे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

4. तक्रारदार तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की आयोगाकडील तक्रार क्रमांक 194/2010 मधील दि. 26.10.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना रु. 110/— टपाल खर्चाची रककम परत करण्यात आलेली आहे. मात्र मुद्या क्र. 8 च्या माहिती बाबत अग्नीरथ संकूल या बांधकामाचे पर्यवेक्षणाची जबाबदारी कोणाची आहे याची माहिती स्पष्टपणे तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविणे आवश्यक आहे. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत शाखेकडून माहिती घेवून अग्नीरथ संकूल या बांधकामाचे पर्यवेक्षणाची जबाबदारी कोणाची आहे याची माहिती स्पष्टपणे तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावी.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1449-1450

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 324/2010**

श्री सुरेश वासुदेवराव पाटील
घर क्र. 12, जुनी ठवरे कॉलनी,
जरिपटका, नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री ए. एम. बोंद्र
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
खापरखेडा औष्णीक वीज केंद्र
ता. सावने जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 27.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 499/2010 मधील दि. 8.6. 2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भातील अभिलेख्याचे निरीक्षण करुन घेतले. मात्र निरीक्षणा नंतर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे त्यांचे तक्रार अर्ज आढळून आले नाहीत. म्हणून त्यांनी दि. 1.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि. 12.1.2006, दि. 23.3.2006, दि. 4.12.2006, तसेच दि. 7.9.2004, दि. 11.4.2005, दि. 3.10.2005, दि. 2.8.2004, दि. 4.7.2010, दि. 20.12.2005, दि. 7.6.2005 इत्यादीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करुन त्यावर प्रशासकीय माध्यमातून काय कार्यवाही केली याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी आयोगाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अभिलेख्याचे निरीक्षण करु दिले मात्र त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, खापरखेडा औष्णीक वीज केंद्र श्री ए. एम. बोंद्र हे उपस्थित होते. त्यांच्या वतीने ॲड. एस. एस. देवळे यांनी आयोगापुढे असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 499/2010 मधील दि. 8.6.2010 च्या निर्णयाप्रमाणे आयोगाच्या आदेशाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. 29.9.2009 रोजी पत्र पाठवून दि. 9.10.2009 रोजी त्यांच्या कार्यालयात अभिलेख्याचे निरीक्षणासाठी बोलाविले होते त्यानुसार तक्रारदार हे दि. 9.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले. त्यांनी रेकॉर्डचे निरीक्षण केले आणि जन माहिती अधिकारी यांचेशी त्यांनी चर्चा केली त्या चर्चेमध्ये तक्रारदार यांना पाहिजे असलेल्या तक्रार अर्जाच्या प्रती त्यांना दिसून आल्या नाहीत. म्हणून तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये असे ठरले की तक्रारदार यांनी त्यांचेकडे असलेले अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे द्यावे त्यानुसार तक्रारदार यांनी दि. 1.1.2010 रोजी त्यांचेकडे उपलब्ध असलेले तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दिलेले आहेत. ही कार्यवाही सुरु असतांना त्यावेळी जन माहिती अधिकारी श्री आर. डी. रॉय हे उपस्थित होते. तथापी त्यांची बदली मे 2010 मध्ये झाली त्यानंतर त्यांच्या जागेवर जन माहिती अधिकारी म्हणून श्री ए. एम. बोंद्र हे रुजू झाले होते. त्यामुळे तक्रारदार यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्यापपर्यंत पुरविता आली नाही. मात्र आता विद्यमान जन माहिती अधिकारी हे 15 दिवसाचे मुदतीत तक्रारदार यांना यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देतील यांची संमती वकीलानी आयोगापुढे दिली.

4. तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांचे वकील यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की आयोगाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना अभिलेख्याचे निरीक्षण करुन देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात बोलाविले होते. त्याप्रमाणे तक्रारदार त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले. त्यांनी अभिलेख्याचे निरीक्षण करुन त्यांचे जवळील अर्जाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिल्या आणि त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली मात्र तक्रारदार यांच्या तक्रार अर्जावर केलेली कार्यवाही अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविलेली नाही म्हणून 15 दिवसात जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या अर्जावर केलेली कार्यवाही विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर

पोस्टाने तक्रारदार यांना उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.



2) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला दिसून येतो. तथापी भविष्यात माहिती पुरविण्यास विलंब होणार नाही याची ताकीद त्यांना देण्यात येत आहे.

3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1451-1453

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 378/2010

श्री विजय उमराव डोंगरे उर्फ डोंगरवार
वार्ड क्र.3(पंचशील झेंडा चौक)
मु. पो. कटंगीकला ता. जि. गोंदिया ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी
ग्रामपंचायत कटंगीकला ता. जि. गोंदिया ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 25.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.2.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार हे हजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी हे गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 1011/2010 मधील दि. 11.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना महिला ग्रामसभेच्या परीपत्रकाची प्रत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही असे सांगितले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की आयोगाकडील अपील क्रमांक 1011/2010 मधील दि. 11.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे आयोगाने प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांना असे आदेश दिले होते की प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना त्याच वेळेस महिला ग्रामसभेच्या परीपत्रकाची प्रत उपलब्ध करुन द्यावी. या आदेशाला अनुसरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी दि. 19.10.2010 रोजी पुन्हा प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेतली त्या सुनावणीस तक्रारदार व जन माहिती अधिकारी हे हजर होते. त्या दिवशी तक्रारदार यांना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण 26 एप्रिल 2002 चे महिला ग्रामसभा राजपत्राची इंग्रजी प्रत

देण्यात आली तसेच उपमुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांना दि. 12.10.2010 रोजी पत्र देवून महिला ग्रामसभा संबंधात आवश्यक परीपत्रक पुरविण्या बाबत विनंती करण्यात आली होती. तथापी उपमुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांनी त्यांचेकडील दि. 11.11.2010 च्या पत्राने असे कळविले की महिला ग्रामसभेचे शासन परीपत्रक उपलब्ध नाही. त्यामुळे तक्रारदार यांना महिला ग्रामसभेचे शासन परीपत्रकाची प्रत उपलब्ध करुन दिली नाही. तथापी तक्रारदार यांना पुरविण्यात आलेले राजपत्र इंग्रजीत असल्यामुळे त्यांना शासन निर्णयाची प्रत पाहिजे आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी महिला ग्रामसभा संबंधी शासन परीपत्रक त्यांच्या कार्यालयात तसेच मुख्यालयात उपलब्ध नसल्यामुळे पुरविता येत नाही असा प्रथम अपीलाचा निर्णय दि. 11.8.2010 रोजी दिलेला दिसून येतो.

4. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की आयोगाच्या आदेशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेतली मात्र महिला ग्रामसभेचे परीपत्रक उपलब्ध नसल्यामुळे तक्रारदार यांना पुरविता येत नाही असा दिलेला निर्णय योग्य दिसून येतो. म्हणून तक्रारदार यांची तक्रार करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1455-1456

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 377/2010

श्री वामन आत्माराम उके
आई 404 अ, महेन्द्र नगर,
डॉ. बी.आर.आंबेडकर वाचनालया समोर
ता. जि. –17 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्रीमती दीप्ती शंकरशेठ
जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(प्रशासन)
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
बॉम्बे लाईफ बिल्डिंग, 5 वा मजला,
45 वीर नरीमन मार्ग,
मुंबई 400001 ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 25.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 3.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा समोर असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 1153/2010 मधील दि. 11.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना महामंडळाकडून माहितीच्या कोणत्याही छायांकित प्रती उपलब्ध झालेल्या नाहीत. तसेच त्यांना आता माहितीची फी भरण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे तथापी त्यांच्या माहितीच्या मळ अर्जातील काही माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ही माहिती देखील त्यांना विनामुल्य उपलब्ध होणे आवश्यक आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(प्रशासन) श्रीमती दीप्ती शंकरशेठ हया उपस्थित होत्या. त्यांच्या वतीने ॲड. सुधीर मेश्राम हे दाखील उपस्थित होते. त्यांनी आयोगा समोर सुनावणीत असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्रमांक 1153/2010 मधील दि. 11.8.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती एकुण 557 असून त्याचे शुल्क रु. 1114/– होते. ते शुल्क भरुन तक्रारदार यांनी माहिती

प्राप्त करुन घ्यावी असे दि. 8.9.2010 च्या पत्राने कळविण्यात आले होते. तथापी तक्रारदार यांनी माहितीच्या फी चा भरणा केला नाही म्हणून त्यांना माहिती पुरविता आली नाही. यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की त्यांना पूर्वी माहिती ते महामंडळाचे कर्मचारी असल्यामुळे विनामुल्य दिलेली आहे. त्याच आधारावर ही माहिती देखील त्यांना विनामुल्य मिळावी असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र आयोगाकडील दि. 31.8. 2010 च्या आदेशात विनामुल्य माहिती तक्रारदारास पुरविण्याचे आदेश नाहीत असे दिसते. म्हणून तक्रारदार यांनी आता नव्याने घ्यावयाच्या माहितीची फी भरणे आवश्यक दिसून येते. सदरची फी भरण्याचे तक्रारदार यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरची फी नागपूर येथील विभागीय कार्यालयात भरणा करुन ती माहिती विभागीय कार्यालयातून उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी तक्रारदार यांनी केली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी माहितीची फी विभागीय कार्यालयात भरल्या नंतर माहिती विभागीय कार्यालय नागपूर येथून उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार हे अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांनी महामंडळाच्या नागपूर विभागीय कार्यालयात फी चा भरणा करावा आणि त्यांनी फी चा भरणा केल्या नंतर जन माहिती अधिकारी यांनी नागपूर विभागीय कार्यालया मार्फत तक्रारदार यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1458-1459

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 384/2010

श्री प्रकाश रामकृष्णजी वाकोडे
पो. वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री जे. व्ही. डवरे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 25.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.2.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 151/2010 मधील दि. 7.4.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडुन माहिती उपलब्ध झाली नाही. आयोगाच्या आदेशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली. सुनावणी घेतल्या नंतर त्यांना माहितीची फी रु. 3356/- भरण्याबाबत दि. 19.8.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वाकी यांनी कळविले. मात्र माहितीची फी ही फार मोठी असल्यामुळे एवढी रक्कम भरण्याऐवजी त्यांना पाहिजे असलेली माहिती ते फी भरुन घेण्यास तयार असल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दाखविल्यास त्यातील त्यांना पाहिजे असलेली माहिती ते फी भरुन घेण्यास तयार असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वाकी ता. सावनेर हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की आयोगाकडील अपील क्रमांक 151/2010 मधील दि. 7.4.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून प्रती पेज रु. 2/- प्रमाणे माहितीची फी आकारुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिले. त्याला अनुसरुन तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीची एकुण फी रु. 3356/- दि.

19.8.2010 च्या पत्राने भरण्याबाबत तक्रारदार यांना कळविले. मात्र तक्रारदार यांनी फी चा भरणा न केलयामुळे त्यांना माहिती देता आली नाही. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी त्यांना प्रथम माहिती दाखवावी त्या माहिती पैकी जी माहिती त्यांना आवश्यक असेल त्याची फी ते भरण्यास तयार आहेत. म्हणून आजच्या सुनावणीस आयोगा समोर असा निर्णय घेण्यात आला की तक्रारदार यांनी दि. 14.3.2011 रोजी दुपारी 12.00 वाजता जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वाकी यांचेकडे त्यांचे कार्यालयात उपस्थित राहावे. त्या ठिकाणी साचिव यांनी तक्रारदार यांना माहिती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. त्यापैकी तक्रारदार यांना आवश्यक असलेली माहिती तक्रारदार यांनी फी भरुन प्राप्त करुन घ्यावी. सदरचा निर्णय तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांचे संमतीने घेण्यात आला. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार हे अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांनी दि. 14.3.2011 रोजी दुपारी 12.00 वाजता जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वाकी ता. सावनेर यांचेकडे त्यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे निरीक्षण करुन घ्यावे आणि त्यांना पाहिजे असलेल्या माहितीची फी प्रथम अपीलातील निर्णयाप्रमाणे प्रती पेज रु. 2/– प्रमाणे भरणा करावी व माहिती तक्रारदार यांनी प्राप्त करुन घ्यावी. तक्रारदार यांनी फी भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1460-1461

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 385/2010**

श्री पुरुषोत्तम मोतीरामजी कोल्हे
रा. नविन बस स्टॅंड समोर, काजी वार्ड हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री चौकडे
जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.2.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 23.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.2.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे गैरहजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ लिपीक जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा श्री चौकडे हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे गैरहजर असल्यामुळे यांचे म्हणणे एकुन घेता आले नाही. मात्र त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीत असे नमुद केले की आयोगाकडील अपील क्रमांक 1296/2010 मधील दि. 22.9.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी असे त्यांनी तक्रार अर्जात नमुद केलेले आहे.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ लिपीक श्री चौकडे जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा हे उपस्थित होते. त्यांनी प्रस्तूत प्रकरणी त्यांचेकडील दि. 22.11.2010 च्या पत्राने सविस्तर खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशात त्यांनी असे नमुद केले की तक्रारदार यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही किंवा त्यांनी तो अर्ज स्वीकारला नाही अशी कृती त्यांचेकडून झालेली नाही तसेच आयोगा विषयी अनुद्गार देखील त्यांनी काढलेले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येवू नये.

4. प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज प्राप्त झालेला दिसून येत नाही किंवा जन माहिती अधिकारी यांनी तो अर्ज स्वीकारला नाही याचा कोणताही पुरावा आयोगासमोर दिसून येत नाही. म्हणून तक्रारदार यांनी त्यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी योग्य त्या अधिका–याकडे माहिती अधिकारा खाली अर्ज सादर करुन प्राप्त करुन घेणे योग्य होईल. तसेच आयोगाकडील अपील क्रमांक 1296/2010 मधील दि. 22.9.2010 निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी असे आदेश यापूर्वीच दिलेले आहेत. म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1463-1464

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**